





पश्चिम विदर्भातील सर्वाधिक खपाचे अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला ■ वर्ष १५ ■ अंक २९३ ■ रविवार, दि. ३ मे २०२६ ■ मुल्य ५ रुपये ■ पृष्ठे ८

RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642 ■ Postal Regn. No. AKL DN/283/2024-2026 http://epaper.citynewssuperfast.com


# लोकशाहीत भर चौकात फाशी देता येत नाही

## काही जणांकडून घटनेला वेगळे वळण देण्याचा प्रयत्न -मुख्यमंत्री

प्रतिनिधी ३ मे


**मुंबई:** नसरापूर येथील चार वर्षीय चिमुकलीवर झालेल्या पाशवी अत्याचार आणि हत्येच्या घटनेने संपूर्ण महाराष्ट्र हादरला आहे. नागरिकांचा संताप आणि रोष स्वाभाविक असला, तरी लोकशाहीत न्याय प्रक्रियेला महत्त्व आहे. या प्रकरणातील नराधमाला फाशीची शिक्षाच व्हावी, यासाठी राज्य सरकार कायद्यातील कोणतीही पळवाट (लूपहोल) न ठेवता हा खटला 'फास्ट ट्रॅक'वर चालवणार असल्याची ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली आहे. तसेच, जलदगतीने न्याय देण्याबाबत राज्य शासनाच्या वतीने पीडितेच्या कुटुंबाला लेखी पत्र देण्यात आल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. तसेच काही लोक शनिवारी रात्री झालेल्या आंदोलनाचा फायदा घेऊन याला वेगळे वळण लावण्याचा प्रयत्न करत होते, असा दावाही देवेंद्र फडणवीस यांनी केला.



नसरापूर अत्याचार आणि हत्या प्रकरणातील पीडित चिमुकलीला न्याय मिळवून देण्यासाठी शनिवारी रात्री पुण्याच्या नवले पुलावर जनआक्रोशाचा उद्रेक झाला. संतप्त ग्रामस्थ आणि नातेवाईकांनी पीडितेचा मृतदेह रस्त्यावर ठेवून महामार्ग रोखून धरल्याने सुमारे चार तास वाहतूक ठप्प होती. अखेर पोलिसांनी बळाचा वापर करत आंदोलकांना पांगवले आणि रस्ता मोकळा केला. मात्र, पुण्याचे पोलिस आयुक्त अमितेश कुमार यांनी अशाप्रकारचा कोणताही लाठीचार्ज झालाच नसल्याचे म्हटले आहे. यावर आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी भाष्य केले. देवेंद्र फडणवीस म्हणाले, 'मी काल स्वत: पीडितेच्या वडिलांशी दोन वेळा बोललो. मी त्यांना समजावून सांगितले की, आपल्याला नराधमाला मृत्युदंडाची शिक्षा करून घ्यायची आहे. त्याकरता वेळेत चार्टशीट दाखल होते आणि केस चालणे यासाठी आम्ही हायकोर्टाच्या माध्यमातून सगळ्या गोष्टींना फास्टट्रॅकवर नेत आहोत. रेकॉर्ड वेळेत काम करण्याचा आमचा प्रयत्न आहे. आपल्या सगळ्यांना असे वाटते की, अशा नराधमाला भर चौकात फाशी दिली पाहिजे. पण तसे लोकशाहीत करता येत नाही. लोकशाही कायद्याने चालते. पण कुणाला कायद्याचा दुरुपयोग करता येऊ नये, यादृष्टीने कुठलाही लूपहोल न ठेवता, या नराधमाला मृत्युदंडाची शिक्षा कशी होईल, अशाप्रकारचा संपूर्ण प्रयत्न राज्यशासनाच्या वतीने केला जाईल. न्यायालयातून हे प्रकरण वेगाने मार्गी लावले जाईल. तशा संदर्भातील एक लेखी पत्र देखील आम्ही पीडितेच्या कुटुंबाला दिले आहे.'नसरापूर अत्याचार आणि हत्या प्रकरणातील पीडित चिमुकलीला न्याय मिळवून देण्यासाठी शनिवारी रात्री पुण्याच्या नवले पुलावर जनआक्रोशाचा उद्रेक झाला.

# दिल्लीत अग्नितांडव ! एसीचा स्फोट 9 जणांचा होरपळून मृत्यू

वृत्तसंस्था ३ मे



**दिल्ली :** दिल्लीतील विवेक विहार भागात एका रहिवासी इमारतीत मध्यरात्री एसीचा स्फोट होऊन भीषण आग लागली. या आगीत ९ जणांचा होरपळून मृत्यू झाला. तर, अनेकजण गंभीररित्या भाजले आहेत. यातील अनेकांची प्रकृती चिंताजनक असल्याने मृतांच्या संख्येत वाढ होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. सध्या आग आटोक्यात आणण्यात आली असून घटनास्थळी कुलिंग ऑपरेशन सुरू आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, इमारतीच्या दुसऱ्या मजल्यावरील एका फ्लॅटमध्ये मध्यरात्री एसीचा स्फोट झाल्याने आग लागली. आगीच्या ज्वाळा तिसऱ्या मजल्यापर्यंत पोहोचताच, फ्लॅटमधील रहिवाशांनी स्वतःचा जीव वाचवण्यासाठी टेरेसच्या दिशेने धाव घेतली. परंतु, टेरेसचा दरवाजा आतून बंद असल्याने अनेकांचा मृत्यू झाला. दुसऱ्या मजल्यावर उपस्थित असलेल्या चार व्यक्तींचाही या दुर्घटनेत आपला जीव गमवावा लागला. तर, एका पलंगावर तीन मृतदेह आढळून आले. या दुर्घटनेतील मृतांची ओळख अद्याप पटलेली नसून याप्रकरणी पोलीस अधिक तपास करीत आहेत.अग्निशमन दलाच्या एका अधिकाऱ्याने सांगितले की, अग्निशमन नियंत्रण कक्षाला पहाटे ३:४७ च्या सुमारास सूचना मिळाली. त्यानंतर अग्निशमनदलाच्या १४ गाड्या घटनास्थळी दाखल झाल्या. आगीवर नियंत्रण मिळवण्यासाठी आणि इमारतीत अडकलेल्या लोकांना बाहेर काढण्यासाठी बचाव कार्य सुरू करण्यात आले. या घटनेत ९ जणांचा होरपळून मृत्यू झाला आहे. तर, ४ जण गंभीररित्या भाजले आहेत. त्यांच्यावर जवळच्या रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

# भाजपा 500 – 700 मतांनी पुढे असेल तर पुन्हा मतमोजणी करा !

## ममता बॅनर्जींचे व्हर्च्युअल बैठकीत कार्यकर्त्यांना निर्देश

वृत्तसंस्था ३ मे

**कोलकाता :** पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री आणि तृणमूल काँग्रेसच्या प्रमुख ममता बॅनर्जी यांनी शनिवारी पक्षाच्या काऊंटींग एजंटना 'ज्या बूथवर भाजपा ५०० ते ७०० मतांच्या फरकाने पुढे असेल, तिथे तातडीने पुन्हा मतमोजणी करण्याची मागणी करावी' असे निर्देश दिले आहेत.



मुख्यमंत्र्यांनी सर्व २९४ विधानसभा मतदारसंघांतील पक्षाचे नेते आणि काऊंटींग एजंटसोबत घेतलेल्या व्हर्च्युअल बैठकीत हे निर्देश दिले. त्यांनी काऊंटींग एजंटना असा सल्ला दिला की, त्यांनी रविवारी रात्री मतमोजणी केंद्रांच्या जवळच मुक्काम करावा, जेणेकरून सोमवारी ते वेळेवर तिथे पोहोचू शकतील. दीड तास चाललेल्या या बैठकीत त्यांनी समन्वय आणि सतर्कतेच्या आवश्यकतेवर भर दिला. 'आयएएनएस'च्या वृत्तानुसार, मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी कार्यकर्त्यांना मतमोजणी केंद्रांवर वेळेआधी पोहोचण्यास आणि एकजुटीने काम करण्यास सांगितलं. मतमोजणी प्रक्रियेदरम्यान लक्षात ठेवण्याच्या महत्त्वाच्या बाबींची माहितीही त्यांनी यावेळी दिली.

# जॉर्डनचा सीरियावर हवाई हल्ला ! दुसऱ्या एका युद्धाला सुरूवात... !

वृत्तसंस्था ३ मे

**नवी दिल्ली :** इराण आणि अमेरिका युद्धामुळे संपूर्ण जग तणावात आहे. या युद्धातून मार्ग निघत नाहीये. युद्ध काही थांबण्याचे नाव घेत नाही. यामध्येच आता जगाची झोप उडवणारी बातमी पुढे येत आहे. पश्चिम आशियाई देशांमध्ये तणाव वाढला आहे. सीरियाला लागून असलेल्या भागांमध्ये वाढती तस्करी आणि सुरक्षेच्या धोक्यांच्या पार्श्वभूमीवर जॉर्डनने मोठे लष्करी पाऊल सीरियाविरोधात उचलले आहे. 'ऑपरेशन जॉर्डन डेटरन्स'चा भाग म्हणून त्यांनी जॉर्डनच्या सैन्याने उत्तरेकडील सीमा थेट ओलांडून सीरियातील अमली पदार्थ आणि शस्त्रास्त्रांच्या तळांवर मोठे हवाई हल्ले केले. जॉर्डनने घुसखोरी रोखण्यासाठी हे पाऊल उचलल्याचे त्यांच्याकडून सांगण्यात येत आहे. थेटपणे मोठा लष्करी हल्लाच जॉर्डनने केला. ज्याने तणाव अधिक वाढला.



इराण आणि अमेरिका युद्ध थांबण्याचे नाव घेत नाहीये. त्यामध्येच आता दुसऱ्या मोठ्या युद्धाला सुरूवात झाली.जॉर्डनकडून करण्यात आलेल्या या हल्ल्यानंतर सीरियाही कोणत्याही क्षणी मोठा हल्ला जॉर्डनवर करू शकतो असा अंदाज आहे. दोन्ही देशात मोठा तणाव गेल्या काही दिवसांपासून बघायला मिळतोय. त्यामध्येच आता हा हवाई हल्ला करण्यात आला. या हवाई हल्ल्यात काही जणांचा जीव गेल्याचीही माहिती पुढे येत आहे. जॉर्डनने सीरियाविरोधात आक्रमक भूमिका घेतल्याचे बघायला मिळत आहे. सीरियाच्या सरकारी माध्यमांनुसार, जॉर्डनने स्वेदा प्रांतातील शाहबा गावाजवळच्या एका मुख्यालयाला टार्गेट करत मोठा हल्ला केला.

# 'गोविंदा.. गोविंदा'च्या जयघोषात अकोला–तिरूपती रेल्वे रवाना !

प्रतिनिधी ३ मे

**अकोला :** विदर्भ, मराठवाडा, तेलंगणा व आंध्र प्रदेशला जोडणाऱ्या तिरुपती-अकोला-तिरुपती साप्ताहिक एक्सप्रेसची नियमित सेवा शनिवार, ३ मे रोजी सकाळी ८ वाजता अकोला रेल्वे स्टेशनच्या प्लॅटफॉर्म क्रमांक ५ वरून सुरू झाली. खा. अनुप धोत्रे यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून गाडी तिरुपतीकडे रवाना झाली. यावेळी 'जय महालक्ष्मी, जय तिरुपती बालाजी, गोविंदा, अशा जयघोषांनी संपूर्ण प्लॅटफॉर्म दुमदुमून गेला होता.




### २० नव्या गाड्यांना मंजुरी

पंतप्रधान नरेंद्र मोदी व रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांच्या नेतृत्वात तीर्थक्षेत्रे जोडणाऱ्या गाड्या सुरू होत आहेत. खा. धोत्रे यांच्या पाठपुराव्यामुळे अकोल्याला आतापर्यंत २० नव्या गाड्या मंजूर झाल्या आहेत. अकोला स्टेशन दक्षिण मध्य रेल्वेत समाविष्ट करणे, प्लॅटफॉर्मवर पासवर्ड सुविधा, डिजिटल डिस्प्ले बसवणे यासाठी त्यांनी महाप्रबंधकांशी संपर्क साधला आहे. लवकरच सुविधा मिळतील.

रेल्वे मंत्रालयाच्या मंजुरीनंतर जारी करण्यात आलेल्या प्रेस रिलीझ नुसार, गाडी क्रमांक १७४२९ तिरुपती-अकोला एक्स्प्रेस ही ८ मे २०२६ पासून दर शुक्रवारी तिरुपतीहून दुपारी १२.२५ वाजता सुटेल व दुसऱ्या दिवशी दुपारी २ वाजता अकोला येथे पोहोचेल. परतीच्या मार्गावर गाडी क्रमांक १७४३० अकोला-तिरुपती एक्स्प्रेस ३ मेपासून दर रविवारी सकाळी ८.१० वाजता अकोल्याहून सुटून सोमवारी सकाळी ८.३० वाजता तिरुपतीला पोहोचेल. ही गाडी काचीगुडा, निजामाबाद, नांदेड, पूर्णा, वसमत, हिंगोली डेक्कन व वाशिम मार्गे धावणार आहे. यावेळी आ. रणधीर सावरकर, महापौर शारदा खेडकर, आ. वसंत खंडेलवाल, आ. प्रकाश भारसाकळे, आ. हरीश पिंपळे, महानगर अध्यक्ष जयंत मसने, किशोर मांगटे पाटील यांच्यासह भाजपा पदाधिकारी व हजारो नागरिक उपस्थित होते.

# जनगणना वेबसाईट सर्वात स्लो

## स्थानाची पुष्टी करण्यासाठी लागतो अर्धातास

प्रतिनिधी ३ मे

**अकोला:** महाराष्ट्रात १ मे डिजिटल जनगणनेच्या पहिल्या टप्प्याला सुरुवात झाली आहे. यामध्ये नागरिकांना 'स्व-गणना' पहिल्यांदाच संपूर्ण जनगणना डिजिटल होत असल्याने आणि कोट्यवधी लोक एकाच वेळी पोर्टलवर (es.census.goved.in) लॉगिन करण्याचा प्रयत्न करत असल्याने सर्व्हरवर प्रचंड ताण येत आहे. विशेषतः 'लोकेशन कन्फर्मेशन' (स्थान पुष्टीकरण) आणि 'OTP' मिळण्यास विलंब होत असल्याच्या तक्रारी येत आहेत.स्व-गणनेसाठी १ मे ते १५ मे हा १५ दिवसांचा वेळ देण्यात आला आहे. प्रशासनाकडून ही प्रक्रिया १५-२० मिनिटांत पूर्ण होईल असा दावा केला जात असला, तरी तांत्रिक बिघाडामुळे नागरिकांना तासनतास वाट पाहावी लागत आहे. १६ मे नंतर प्रत्यक्ष क्षेत्रीय काम सुरू होणार आहे. वेबसाईटवरील ताण कमी करण्यासाठी पहाटे किंवा रात्री उशिरा प्रयत्न केल्यास फॉर्म लवकर भरला जाऊ शकतो. स्व-गणना यशस्वी झाल्यावर मिळणारा ११ अंकी Self-Enumeration ID (SE ID) जपून ठेवावा. जेव्हा प्रगणक तुमच्या घरी येतील, तेव्हा त्यांना फक्त हा आयडी दिल्यास तुमची प्रक्रिया पूर्ण होईल.

जर तांत्रिक अडचणींमुळे ऑनलाईन फॉर्म भरता आला नाही, तर काळजी करण्याचे कारण नाही. १६ मे पासून प्रगणक स्वतः तुमच्या घरी येऊन माहिती नोंदवतील.प्रशासनाने या तांत्रिक त्रुटींकडे लक्ष देऊन सर्व्हरची क्षमता वाढवणे गरजेचे आहे, जेणेकरून डिजिटल इंडियाचा हा उपक्रम नागरिकांसाठी डोकेदुखी ठरणार नाही.


सिटी न्यूज सुपरफास्ट
नियमित वाचा
नवनविन घडामोडींसह
अकोला, वाशिम, यवतमाळ,
अमरावती, बुलडाणा येथून
एकाच वेळी प्रकाशित



# कमी गुणांमुळे विद्यार्थ्याची आत्महत्या

प्रतिनिधी ३ मे

**उमरखेड (यवतमाळ) :** बारावीच्या निकालानंतर केवळ ४४ टक्के गुण मिळाल्याने नैराश्यग्रस्त झालेल्या १७ वर्षीय विद्यार्थ्याने आज दुपारी घरात गळफास घेऊन आत्महत्या केल्याची हृदयद्रावक घटना उमरखेड येथील यादव नगर परिसरात घडली. या घटनेमुळे परिसरासह मृत विद्यार्थ्याच्या मूळ गावात हळहळ व्यक्त होत आहे.



श्रुतेश श्रीराम कदम (१७) असे मृत विद्यार्थ्याचे नाव आहे. तो उमरखेड येथील यादव नगरात राहणारे शिक्षक श्रीराम कदम यांचा मुलगा असून, मूळ गाव मार्लेगाव (ता. उमरखेड) आहे. श्रुतेशने ढाणकी येथील अनुदानित उच्च माध्यमिक आश्रम शाळेतून बारावीची परीक्षा दिली होती. आज दुपारी निकाल लागल्यानंतर त्याला केवळ ४४ टक्के गुण प्राप्त झाल्याचे समजताच तो मोठ्या नैराश्यात सापडला. आई-वडील सकाळी चुलत बहिणीच्या लग्न समारंभासाठी गावाकडे गेले होते. श्रुतेशने स्वतः त्या समारंभासाठी गिफ्टही आणून दिले होते. दुपारी तीन वाजण्याच्या सुमारास घरी एकटा असताना त्याने राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केली. दुपारी चार वाजता आई-वडील परत आल्यानंतर हा प्रकार उघडकीस आला. आजच चुलत बहिणीचे लग्न, कुटुंबावर दुःखाचा डोंगर दुर्दैवी बाब म्हणजे, आज ३ मे रोजी मार्लेगाव येथे श्रुतेशच्या चुलत बहिणीचे लग्न ठरले होते. एकीकडे आनंदाचा उत्सव साजरा होणार होता, तर दुसरीकडे या घटनेमुळे कदम कुटुंबावर दुःखाचा मोठा डोंगर कोसळला आहे. गावात शोककळा पसरली असून, परिसरातील नागरिक घटनेमुळे हादरले आहेत. पोलिसांनी शवविच्छेदनासाठी पाठवले असून, प्राथमिक तपासात निकालातील कमी गुणांमुळे नैराश्य आले असावे, असे कारण समोर आले आहे.






# बुद्ध पौर्णिमेच्या चंद्रप्रकाशात वन्यप्राण्यांचे दर्शन

## काटेपूर्णा मध्ये 350 तर ज्ञानगंगा मध्ये 635 प्राण्यांची नोंद

प्रतिनिधी ३ मे

**अकोला:** १ मे रोजी बुद्ध पौर्णिमेच्या पार्श्वभूमीवर चंद्राच्या लख्ख प्रकाशात काटेपूर्णा, कारंजा सोहळ तसेच ज्ञानगंगा अभयारण्यात वन्य प्राणी गणना पार पडली. असून या वेळी पर्यटकांना डोळ्याचे पारणे फेडणारे दृश्य पाहायला मिळाले. काटेपूर्णा अभयारण्यात व ज्ञानगंगा अभयारण्यात मोठ्या प्रमाणात बीबट व अस्वल दिसून आलेत.



अकोला जिल्ह्यात वन्य प्राण्यांची गणना करण्यासाठी वन्यजीव विभागाने व्यापक तयारी पूर्ण केली होती. बुद्ध पौर्णिमेच्या रात्री चंद्रप्रकाशात अभयारण्यातील विविध पाणवठ्याजवळील मचाण वर पर्यटक व वन कर्मचारी वन्य प्राणी गणनेत सहभाग दर्शविला. अकोला जिल्ह्यातील काटेपूर्णा अभयारण्य, वाशिम जिल्ह्यातील कारंजा सोहळ तर बुलढाणा जिल्ह्यातील ज्ञानगंगा अभयारण्यात सदरची प्राणी गणना पार पडली आहे. काटेपूर्णा अभयारण्यातील नऊ मचाणवर, कारंजा सोहळ अभयारण्यातील पाच मचाणवर तर ज्ञानगंगा अभयारण्यातील एकविस मचाण पर्यटकांनी विविध प्राण्यांची चित्त थरारक अनुभव घेतले. अकोला, वाशिम तसेच बुलढाणा जिल्ह्यातील एकूण ३५ कृत्रिम तसेच नैसर्गिक पानवट्यांवर चंद्राच्या लख्ख प्रकाशात मोठ्या प्रमाणात वन्यप्राणी दिसून आले. यावेळी काटेपूर्णा अभयारण्यात आठ पानवट्यांवर ३५० पेक्षा जास्त वन्यप्राणी दिसून आले. या मध्ये ५ बिबट, २ अस्वल तर इतर वन्य प्राणी दिसून आले, गेल्या वर्षीच्या तुलनेत यावर्षी काटेपूर्णा अभयारण्यातील पानवट्यांवर बिबट्यांची संख्या जास्त दिसून आली. याच बरोबर ज्ञानगंगा अभयारण्यात २५ बिबट, २९ अस्वल सह ६३५ वन्यप्राणी दिसून आलेत. सदरची वन्यप्राणी गणना ही वन्यजीव विभागाचे विभागीय वन अधिकारी यशवंत नागुलवार यांच्या मार्गदर्शनात सहाय्यक वन सवरक्षक चेतन राठोड, काटेपूर्णा चे वनपरिक्षेत्र अधिकारी शिंदे, ज्ञानगंगा चे वन परिक्षेत्र अधिकारी दीपेश लोखंडे, पांडुरंग पाटील, प्रकाश सावळे व इतर अधिकारी कर्मचाऱ्यांनी पार पाडली.

सिटी न्यूज सुपरफास्ट विविधा
रविवार, दि. ३ मे २०२६
http://epaper.citynewssuperfast.com

# आज जागतिक पत्रकार स्वातंत्र्य दिन

असे अनेकदा म्हटले जाते की, 'जिथे शब्दांना स्वातंत्र्य नसते, तिथे लोकशाही मरते.' चला, जागतिक पत्रकार स्वातंत्र्य दिनाचे गांभीर्य आणि सद्य आव्हाने एका नव्या दृष्टिकोनातून समजून घेऊया. याची सुरुवात १९९१ मध्ये युनेस्कोच्या एका परिषदेत झाली, जिथे 'विंडहोक घोषणापत्रा'चा मसुदा तयार करण्यात आला. जगभरातील पत्रकार स्वातंत्र्याला पाठिंबा देणे आणि निष्पक्ष पत्रकारितेचा आधार असलेल्या तत्त्वांचे संरक्षण करणे हा याचा उद्देश होता. संयुक्त राष्ट्र महासभेने १९९३ मध्ये हा दिवस अधिकृतपणे घोषित केला. आजच्या डिजिटल युगात पत्रकार स्वातंत्र्याचे स्वरूप बदलले आहे. आव्हाने आता केवळ शारीरिक हल्ल्यांपुरती मर्यादित राहिलेली नाहीत, तर सोशल मीडियावर पसरणाऱ्या खोट्या बातम्यांच्या गर्दीत खऱ्या पत्रकारितेला वाचवणे हे सर्वात मोठे आव्हान आहे.

अकोला : जागतिक पत्रकार स्वातंत्र्य दिन दरवर्षी ३ मे रोजी जगभरात साजरा केला जातो. हा दिवस पत्रकार, माध्यम कर्मचारी आणि माध्यम स्वातंत्र्याचा सन्मान करण्यासाठी समर्पित आहे. पत्रकारिता हे केवळ बातम्या देण्याचे माध्यम नाही; ती समाजाचे डोळे आणि कान आहे, जी सत्ता आणि सामान्य जनता यांच्यात संतुलन राखते. हा दिवस केवळ कॅमेऱ्यासमोर माईक घेऊन उभे राहणाऱ्या किंवा वृत्तपत्रांमध्ये स्तंभ लिहिणाऱ्यांसाठी नाही. हा दिवस त्या लाखो लोकांसाठी आहे ज्यांना माहिती मिळवण्याचा आणि सत्य जाणून घेण्याचा अधिकार आहे.




लोकशाहीमध्ये पत्रकारितेला सर्वोच्च महत्त्व आहे. स्वतंत्र माध्यमे नागरिकांना सत्याची माहिती देतात, भ्रष्टाचार आणि अन्यायाविरुद्ध आवाज उठवतात आणि समाजात जागरूकता पसरवतात. आजच्या डिजिटल युगात, जिथे सोशल मीडिया आणि ऑनलाइन प्लॅटफॉर्मने माहितीचा प्रसार अधिक वेगवान आणि व्यापक केला आहे, तिथे माध्यम स्वातंत्र्य आणि निष्पक्षता टिकवून ठेवणे अधिकच आव्हानात्मक झाले आहे. शिवाय, हा दिवस आपल्याला यावर चिंतन करण्यास प्रवृत्त करतो की, आपण माध्यमांवरील विश्वास कसा टिकवून ठेवू शकतो आणि पत्रकारिता समाजाच्या योग्य दिशेने कशी काम करू शकते.

असे अनेकदा म्हटले जाते की, 'जिथे शब्दांना स्वातंत्र्य नसते, तिथे लोकशाही मरते.' चला, जागतिक पत्रकार स्वातंत्र्य दिनाचे गांभीर्य आणि सद्य आव्हाने एका नव्या दृष्टिकोनातून समजून घेऊया. याची सुरुवात १९९१ मध्ये युनेस्कोच्या एका परिषदेत झाली, जिथे 'विंडहोक घोषणापत्रा'चा मसुदा तयार करण्यात आला. जगभरातील पत्रकार स्वातंत्र्याला पाठिंबा देणे आणि निष्पक्ष पत्रकारितेचा आधार असलेल्या तत्त्वांचे संरक्षण करणे हा याचा उद्देश होता. संयुक्त राष्ट्र महासभेने १९९३ मध्ये हा दिवस अधिकृतपणे घोषित केला. आजच्या डिजिटल युगात पत्रकार स्वातंत्र्याचे स्वरूप बदलले आहे. आव्हाने आता केवळ शारीरिक हल्ल्यांपुरती मर्यादित राहिलेली नाहीत, तर सोशल मीडियावर पसरणाऱ्या खोट्या बातम्यांच्या गर्दीत खऱ्या पत्रकारितेला वाचवणे हे सर्वात मोठे आव्हान आहे. पत्रकारांवर पाळत ठेवणे आणि डेटा हॅकिंगमुळे गोपनीयतेबद्दल प्रश्न निर्माण झाले आहेत. अनेकदा, अल्गोरिदम आणि धोरणांच्या नावाखाली सत्य दडपण्याचे प्रयत्न केले जातात.

कल्पना करा, जर प्रसारमाध्यमे नसती, तर सरकारचा पैसा कुठे जातोय हे तुम्हाला कळले असते का? किंवा समाजाच्या कुठल्याही कानाकोपऱ्यात घडणाऱ्या अन्यायाची बातमी तुमच्यापर्यंत कशी पोहोचली असती? सत्तेत असलेल्यांना कठीण प्रश्न विचारण्याचे धाडस माध्यमांमध्ये आहे. महामारी असो वा हवामान बदल, प्रसारमाध्यमेच आपल्याला धोक्यांबद्दल सावध करतात. अनेकदा, जेव्हा शोषित लोकांचा आवाज वर्तमानपत्रांची मुख्य बातमी बनतो, तेव्हाच त्यांना न्याय मिळतो. वृत्तपत्र स्वातंत्र्य ही केवळ पत्रकारांची जबाबदारी नाही. एक समाज म्हणून आपण हे केलेच पाहिजे, चांगल्या आणि शोध पत्रकारितेला पाठिंबा दिला पाहिजे, आपण पत्रकारांच्या सुरक्षेसाठी आणि त्यांच्या हक्कांसाठी आवाज उठवला पाहिजे.

थोडक्यात सांगायचे झाल्यास, पत्रकारिता स्वातंत्र्य दिन आपल्याला आठवण करून देतो की स्वतंत्र पत्रकारिता हे एका स्वतंत्र राष्ट्राचे वैशिष्ट्य आहे. पत्रकारिता हा केवळ एक व्यवसाय नाही, तर तो समाजाचा आवाज आहे. म्हणूनच, या दिवशी आपण पत्रकारांच्या योगदानाचे स्मरण करूया, त्यांच्या हक्कांचा आदर करूया आणि माध्यम स्वातंत्र्याचे रक्षण करण्यासाठी सतर्क राहूया. तसेच, सत्य उघडकीस आणण्यासाठी आपला जीव धोक्यात घालणाऱ्या त्या पत्रकारांनाही आपण सलाम करूया.

# फिटनेस जर्नी आणि मोटिव्हेशन

सतत एकच व्यायाम किंवा एकच आहार पद्धत पाळल्यामुळे कंटाळा येतो आणि रस कमी होतो.

कोणत्या गोष्टी फिटनेसवर परिणाम करतात? फक्त व्यायामच नाही, तर इतर अनेक गोष्टी फिटनेस जर्नीवर थेट परिणाम करतात. पुरेशी झोप नसेल तर शरीराला पुनर्प्राप्ती मिळत नाही आणि ऊर्जा कमी होते. चुकीचा आहार घेतल्यास अपेक्षित परिणाम मिळत नाहीत. जास्त ताण असल्यास प्रेरणा कमी होते. योग्य वातावरण नसेल–जसे की साथ देणारे लोक किंवा चांगले व्यायामशाळेचे वातावरण–तर सातत्य राखणे कठीण जाते.



आजच्या काळात आपण पाहतो की अनेक लोक वेगवेगळ्या उद्दिष्टांसह मोठ्या उत्साहाने आपली फिटनेस जर्नी सुरू करतात. त्यासाठी काहीजण जिम, फिटनेस क्लब, झुंबा क्लासेस, योगा इन्स्टिट्यूट्स अशा विविध पर्यायांचा अवलंब करतात. सुरुवातीचे काही दिवस खूप चांगले जातात—नियमित व्यायाम, योग्य आहार आणि भरपूर ऊर्जा यामध्ये कोणतीही कमतरता दिसत नाही.

परंतु कालांतराने अनेकांचा उत्साह कमी होऊ लागतो. काहींचा रस हळूहळू कमी होतो, तर काहीजण पूर्णपणे थांबतात. प्रत्यक्षात, बहुतांश लोकांना आपला फिटनेस सुधारायचा असतो, शरीर आकर्षक दिसावे असे वाटते आणि त्यासाठी काय करावे हेही त्यांना माहिती असते.

मात्र, या सर्वांमध्ये एक समान समस्या अनेकदा दिसून येते—ती म्हणजे मोटिव्हेशनचा अभाव किंवा त्यात होणारी घट.

फिटनेस जर्नी का तुटते?

फिटनेस जर्नीची सुरुवात जरी जोशात होत असली, तरी काही दिवसांनी सातत्य का तुटते यामागे काही महत्त्वाची कारणे असतात.

सर्वप्रथम, अनेकजण सुरुवातीलाच खूप मोठी आणि अवास्तव ध्येये ठरवतात. कमी वेळात मोठे बदल अपेक्षित ठेवल्यामुळे जेव्हा अपेक्षित परिणाम दिसत नाहीत, तेव्हा निराशा येते आणि प्रेरणा कमी होऊ लागते.

तसेच, ङ्कआज व्यायाम झाला नाही म्हणजे सगळंच बिघडलंङ्क अशी विचारसरणीही जर्नी तोडते. एक-दोन दिवस चुकले की अनेकजण पूर्णपणे थांबतात.

याशिवाय, अनेकजण प्रेरणेवर जास्त अवलंबून असतात. सुरुवातीचा उत्साह काही दिवस टिकतो, पण तो कायम राहत नाही. आणि जेव्हा प्रेरणा कमी होते, तेव्हा व्यायामही थांबतो.

दैनंदिन जीवनातील कारणे देखील तितकीच महत्त्वाची असतात—

आज कामामुळे खूप थकलो आहे,
उद्यापासून सुरू करू,
आज झोप पूर्ण झाली नाही,
वेळापत्रक खूप व्यस्त आहे

अशी कारणे सुरुवातीला लहान वाटतात, पण हळूहळू ती सवय बनते आणि फिटनेस जर्नी पूर्णपणे थांबते.

तसेच, सतत एकच व्यायाम किंवा एकच आहार पद्धत पाळल्यामुळे कंटाळा येतो आणि रस कमी होतो.

कोणत्या गोष्टी फिटनेसवर परिणाम करतात?

फक्त व्यायामच नाही, तर इतर अनेक गोष्टी फिटनेस जर्नीवर थेट परिणाम करतात.

पुरेशी झोप नसेल तर शरीराला पुनर्प्राप्ती मिळत नाही आणि ऊर्जा कमी होते.

चुकीचा आहार घेतल्यास अपेक्षित परिणाम मिळत नाहीत.

जास्त ताण असल्यास प्रेरणा कमी होते.

योग्य वातावरण नसेल—जसे की साथ देणारे लोक किंवा चांगले व्यायामशाळेचे वातावरण—तर सातत्य राखणे कठीण जाते.

तसेच, स्पष्ट नियोजन नसल्यास दिनक्रम पाळणे अवघड होते.

फिटनेस जर्नी टिकवण्यासाठी काय करावे?

फिटनेस जर्नीमध्ये सातत्य राखण्यासाठी काही सोप्या पण प्रभावी गोष्टी लक्षात ठेवणे आवश्यक आहे.

सर्वप्रथम, मोठ्या ध्येयांऐवजी छोटे आणि वास्तववादी ध्येये ठेवा.

उदा. दररोज २०–३० मिनिटे व्यायाम किंवा आठवड्यात ४ दिवस व्यायामशाळा.

प्रेरणेपेक्षा शिस्त अधिक महत्त्वाची आहे हे स्वीकारा.

मन नसतानाही व्यायाम करणे हीच खरी सवय आहे.

परिपूर्ण दिनक्रमाच्या मागे धावू नका. त्याऐवजी लवचिक दिनक्रम ठेवा.

वेळ कमी असेल तर कमी वेळ व्यायाम करा, पण पूर्णपणे टाळू नका.

व्यायामाला एक ङ्कपर्यायङ्क न ठेवता ङ्कसवयङ्क बनवा.

जसे रोज दात घासणे आवश्यक असते, तसेच व्यायामही आवश्यक आहे.

व्यायामामध्ये विविधता ठेवा—जिम, हृदयविकारासाठीचे व्यायाम (कार्डिओ), योगा, खेळ यांचा समावेश करा.

यामुळे कंटाळा येत नाही आणि जर्नी अधिक आनंददायी होते.

आपली प्रगती लक्षात ठेवा—वजन, शरीराचे माप, ताकद यामध्ये होणारे बदल पाहा.

छोटे बदलही प्रेरणा वाढवतात.

तसेच, आपल्या आसपास सकारात्मक वातावरण ठेवा—योग्य प्रशिक्षक, चांगले व्यायामशाळेचे वातावरण आणि साथ देणारे लोक यामुळे सातत्य राखणे सोपे जाते.



गणेश अंभोरे
द फिटनेस हब
फिटनेस प्रोफेशनल अँड न्युट्रिशनिस्ट अकोला

# सेंट पॉल्स ज्युनिअर कॉलेजचा १०० टक्के निकाल; गुणवंत विद्यार्थ्यांची चमकदार कामगिरी

वि. प्रतिनिधी ३ मे

**अकोट :** शहरातील सेंट पॉल्स अकॅडमी अंतर्गत सेंट पॉल्स ज्युनिअर कॉलेजने यावर्षीही आपल्या उज्ज्वल निकालाची परंपरा कायम राखत विज्ञान शाखेत शंभर टक्के निकाल नोंदविला आहे. विद्यार्थ्यांच्या या यशामुळे संस्थेचे नाव पुन्हा एकदा उजळले आहे.




या परीक्षेत कु. ऋतुजा वासुदेव काळे हिने ९०.३३ टक्के गुण मिळवत प्रथम क्रमांक पटकावला. अधिरथ निलेश ठाकरे (८९.६७ ज्ञ्) याने द्वितीय, तर कु. कृष्णाली दिनेश कोकाटे (८६.५०ज्ञ्) हिने तृतीय क्रमांक मिळविला.

तसेच किशोर दयानंद सावंग (८३.५०ज्ञ्), वंश पवन गुप्ता (८३.३३ज्ञ्), कु. गौरी उमेश मेतकर(८३.३३ज्ञ्), अंश निलेश गणात्रा (८३.१७ज्ञ्), माज खान नासिर खान (८२.६७ज्ञ्), वंश मनीष हरकंठ (८१.३३ज्ञ्), कु. सृष्टी संदीप मंगळे (७९.६७ज्ञ्) व श्रवण संजय बोडखे (७७.६७ज्ञ्) या विद्यार्थ्यांनीही उल्लेखनीय यश संपादन केले. या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांनी आपल्या यशाचे श्रेय संस्थेचे अध्यक्ष नवनीतजी लखोटिया, सचिव प्रमोदजी चांडक, उपाध्यक्ष लुनकरणजी डागा, प्राचार्य विजयजी बिहाडे, उपप्राचार्या ममता श्रावगी व रिंकू अग्रवाल, तसेच शाळा व्यवस्थापक प्रभुदास नाथे, नीलिमा देशमुख, नितेश इलामे, अभिजीत मेंढे, नितीन गावंडे, तृप्ती चवरे, सतीश ठोकळ, रोहिणी कोकाटे आणि सर्व शिक्षकवृंद यांना दिले आहे.

या उल्लेखनीय यशाबद्दल सेंट पॉल्स अकॅडमीतर्फे सर्व विद्यार्थ्यांचे मनःपूर्वक अभिनंदन करण्यात आले आहे.

# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या जयंतीदिनी ओल्ड एज होमला सुरुवात

प्रतिनिधी ३ मे

**अकोटः** वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या जयंती निमित्त ३० एप्रिल रोजी छत्रपती शिवबा बहुउद्देशीय सेवाभावी शिक्षण संस्था अकोट द्वारा शहरातील निराधार लोकांसाठी स्नेहभोजनाची व्यवस्था व्हावी म्हणून ओल्ड एज होम ची सुरुवात करण्यात आली. या उपक्रमा अंतर्गत निराधार, वृद्ध लोकांना दररोज सकाळी व सायंकाळी दोन वेळच्या भोजनाची व्यवस्था करून देण्यात येईल अशी माहिती संस्थापक अध्यक्ष यांनी दिले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, संत गाडगे महाराज ह्या थोर पुरुषांनी नेहमीच आपल्या कीर्तनातून समाजाला योग्य मार्ग दाखवण्याचे काम केले. संत गाडगे महाराज व राष्ट्रसंत तुकडोजी महाराज आपल्या कीर्तनातून नेहमी म्हणायचे की भुकेलेल्याला अन्न, तहानलेल्याला पाणी, निराधारास आधार द्यावा. आणि याच तत्त्वानुसार छत्रपती शिवबा प्रतिष्ठानच्या वतीने ओल्डेच होमला सुरुवात करण्यात आली आहे.



अकोट येथे अंजनगाव रोड रिलायन्स पेट्रोल पंप समोर साबळे कॉम्प्लेक्स येथे ह्या सामाजिक उपक्रमाची काल सुरुवात करण्यात आली तरी आपल्या आजूबाजूच्या परिसरातील निराधार लोकांना या उपक्रमाची माहिती द्यावी असे आवाहन संस्थापक अध्यक्ष यांनी केले आहे.

# ग्रामीण भागातील विद्यार्थीनीची मुंबईत बाजी

प्रतिनिधी ३ मे

**कुटासाः** अकोला जिल्ह्यातील अनकवाडी गावातील कु. प्रियांशी आसाराम जामनेकर या विद्यार्थीनीने मुंबईत बाजी मारली. सिटीझन हायस्कुल व ज्युनियर कॉलेज मध्ये ८७.५० टक्के गुण घेत घवघवीत यश प्राप्त करुन उरण तालुक्यातून प्रथम क्रमांक पटकावला आहे.




गरीब कुटुंबातील मुलीने परिस्थितीचे चटके सहन करत यश प्राप्त केल्याने तिचे कौतुक होत आहे. घरची परीस्थिती हालाखीची असुन सुद्धा मिळविलेले यश हे लाखात एक आहे. प्रियांशीचे वडील आसाराम जामनेकर हे शेतकरी आहेत व आई सुद्धा छोटासा व्यवसाय करुन कुटुंबाला हातभार लावते. प्रियांशीच्या यशाचे कौतुक होत आहे.

# कर्जाला कंटाळून शेतकऱ्याची विहिरीत उडी घेऊन आत्महत्या

प्रतिनिधी ३ मे

**आलेगावः** चान्नी पोलीस स्टेशन अंतर्गत राहेर येथे कर्जाला कंटाळून शेतकऱ्यांने विहीरीत उडी घेऊन आत्महत्या केल्याची घटना १ मे रोजी घडली. मृतक शेतकऱ्यांचे नाव राजेश विठ्ठल काळे (३५) रा.राहेर आहे. सततची नापिकी व अतिवृष्टीमुळे पीक बरोबर होत नसल्याने तर डोक्यावर बँकेचे कर्ज असल्याने ते अनेक दिवसांपासून विवंचनेत होते.

एकीकडे आसमानी संकट असताना शासनाच्या उदासीन धोरण व सुलतानी संकटाला सामोरी जाताना या शेतकऱ्याचा संयमाचा बांध फुटला आणि अखेर त्यांनी टोकाचा पाऊल उचललं शेतात काम करत असताना गावालगत असलेल्या त्यांच्या बाजूला सत्यफुलाबाई पाचपोर यांचे शेतात असलेल्या विहीरी मध्ये उडी घेत आत्महत्या केली.शेतात ते काम करत असताना शेतात त्यांच्या सोबत एक लहान मुलगी होती त्यांनी विहीरी मध्ये उडी घेतली तेव्हा त्या मुलीनी आरडाओरडा केली लगेचच घरी पळाली.



आई बाबा येईपर्यंत मृतदेह विहीरीतील पाण्यावर तरंगताना दिसून आला. घटनेची माहीती मिळताच चान्नी पोलीस स्टेशनचे ठाणेदार रविंद्र लांडे यांनी सहकाऱ्यांसह घटनास्थळ गाठून पंचनामा केला आणि मृतदेह विहिरीतून बाहेर काढत अकोला येथील सर्वोपचार रुग्णालयात पाठविला.

याप्रकरणी चान्नी पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद करून तपास सुरू केला आहे. मृताच्या कुटुंबीयांना राज्य सरकारने आर्थिक मदत करावी, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.त्याच्या पश्चात पत्नी,एक मुलगा,तिन मुली, आई.वडील भाऊ,बहीण,असा परिवार आहे.

# हिवरखेड तेल्हारा मार्गे अकोला बस सुरू करा

## ग्रामीण पत्रकार संघाची मागणी

**हिवरखेडः** तेल्हारा अकोला मार्गे बस सुरू करण्याची मागणी २मे रोजी अखिल भारतीय ग्रामीण पत्रकार संघ तेल्हारा हिवरखेडच्या वतीने तेल्हारा बस आगार व्यवस्थापन यांना करण्यात आली.



आगार व्यवस्थापक शर्मा यांना हे निवेदन देण्यात आले. हिवरखेड अकोट मार्गाचे काम सुरू असल्याने हिवरखेड अकोट मार्गे अकोला जाण्यास विलंब होतो, प्रवाशी विद्यार्थी यांची गैरसोय होऊ नये याकरिता तात्काळ ही बस सकाळ दरम्यान तापमानाचा वेग पाहून सुरु करण्यात यावी, ही मागणी पत्रकार संघाचे वरिष्ठ मनोहर सुने, कैलासबापू देशमुख, युसूफखान यांच्या मार्गदर्शनाखाली नाना इंगोले, धीरज बजाज, नंदकिशोर नागपुरे, राजपाल दामोदर, देवकीनंदन माथेरिया विजय घोडे, अर्जुन खिरोडकार, यांच्या स्वाक्षरीने संघटनेच्या पदाधिकाऱ्यानंच्या वतीने करण्यात आली.

# शाहबाबू उर्दू कनिष्ठ महाविद्यालयाचा निकाल १०० टक्के

प्रतिनिधी ३ मे

**आलेगांव :** शाहबाबू एज्युकेशन सोसायटी द्वारा संचालित आलेगांव येथील. शाहाबाबू कनिष्ठ महाविद्यालय चा १२ चा निकाल जाहीर करण्यात आला असून दरवर्षी ची परंपरा कायम ठेवत यंदाही इयत्ता १२ वी. चा निकाल १०० प्रतिशत लागला आहे. शाहा बाबू कनिष्ठ महाविद्यालय च्या कला शाखेतून यंदा १४ विद्यार्थी परीक्षेला बसले होते त्यापैकी १४ हि विद्यार्थी उत्तीर्ण झाले .तर सादीया सदफ सय्यद अलताफ अली ७०. ५० प्रथम, द्वितीय तबस्सुम फातेमा ६५.१७ प्रतिशत ,व तृतीय शेख अयान शेख अनवर ५८.१७ टक्के गुण मिळवून उत्तीर्ण झाले. विद्यार्थ्यांनी आपल्या यशांचे श्रेय संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी सय्यद इसहाक राही व प्राचार्य शेख मोबीन, पर्यवेक्षक मोहम्मद सादीक यांना दिले.



# तेल्हारा ग्रामीण ब्लॉक काँग्रेस सोशल मीडियाच्या अध्यक्षपदी नंदकिशोर नागपुरे यांची नियुक्ती

**अडगावः** प्रदेश काँग्रेस कमिटीचे प्रांताध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या आदेशानुसार, तेल्हारा ग्रामीण ब्लॉक काँग्रेस सोशल मीडियाच्या अध्यक्षपदी नंदकिशोर नागपुरे यांची नियुक्ती करण्यात आली आहे.



ॲड.महेश गणगणे महासचिव प्रदेश काँग्रेस कमिटी,अकोला जिल्हा अध्यक्ष अशोकराव अमानकर,तेल्हारा ता.अध्यक्ष गजानन वानखडे, पक्षाच्या सर्व वरिष्ठ नेतृत्वाचे आभार मानले.

आगामी काळात पक्ष संघटना डिजिटल माध्यमातून अधिक सक्षम करण्यासाठी आपण पूर्ण निष्ठेने आणि सक्रियपणे काम करणार असल्याचे सांगितले आहे.

## साहित्यिक, लेखकांना आवाहन

**दैनिक सिटी न्यूज सुपरफास्ट** आता आठ पानांसह वाचकांना उपलब्ध होत आहे. अंकातील विविधा पानासाठी अकोला शहर तसेच जिल्ह्यातील साहित्यिक, लेखक, कवी यांनी त्यांचा मजकूर ८३९०६७०९९९ या **व्हॉटसअप** क्रमांकावर पाठवावा.

त्याला यथायोग्य प्रसिद्धी दिली जाईल. या अंकातील लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

सिटी न्यूज अकोला
रविवार, दि. ३ मे २०२६
http://epaper.citynewssuperfast.com

## आगरकर ज्युनिअर कॉलेजच्या आयुष सोनवणेचे नेत्रदीपक यश

**अकोला:** आगरकर ज्युनिअर कॉलेजचा विद्यार्थी आणि उज्ज्वल पब्लिक स्कूलच्या मुख्याध्यापिका सौ. उज्वला नरेंद्र सोनवणे व नायब तहसीलदार नरेंद्र सोनोने यांचा मुलगा आयुष नरेंद्र सोनवणे यानेहउल्लेखनीय यशाने उज्ज्वल परंपरा कायम राखली आहे. आयुषने मिळवलेल्या या यशाबद्दल त्याचे सर्वस्तरातून अभिनंदन होत आहे.



आयुषच्या या यशाचे श्रेय त्याचे कठोर परिश्रम, आई-वडिलांचे मार्गदर्शन आणि शिक्षकांच्या सहकार्याला जाते. त्याच्या या यशाबद्दल आगरकर ज्युनिअर कॉलेजचे प्राचार्य, शिक्षकवर्ग तसेच मित्रपरिवाराकडून त्याचे कौतुक करण्यात येत असून, त्याच्या भावी शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या जात आहेत.

## हरीस खान याला ८९.३३ टक्के गुण

**अकोला:** उच्च माध्यमिक शालांत परीक्षेत हरीस खान फिरोज खान याने ८९.३३ टक्के गुण मिळवून लौकिक



प्राप्त केला. ६०० पैकी ५३६ गुण त्याने संपादन केले. सुरूवाती पासून गुणवान विद्यार्थी म्हणून हरीस खान याची ख्याती आहे. त्याच्या यशाचे अनेकांनी अभिनंदन केले.

## सुमिरमा फाउंडेशनच्या वतीने मोफत औषध वितरण

**अकोला:** सुमिरमा फाउंडेशनच्या वतीने बुद्ध पूर्णिमा साजरी करण्यात आली. या पावन पर्वावर फाउंडेशन च्या वतीने मोफत औषध वितरण शिबीर राबविण्यात आले. बौद्ध पौर्णिमेच्या अनुषंगाने सुमिरमा फाउंडेशनच्या वतीने शिर्ला जवळील बौद्धभूमी येथे भव्य मोफत औषधी व बुद्ध वंदना पुस्तिका वितरीत करण्यात आल्यात. यावेळी हजारो उपासक आणि उपासीकांना यासेवेचा लाभ मिळाला. फाउंडेशनच्या अध्यक्षा डॉ. पूजा सुमित्रा रमाकांत खेतान यांच्या मार्गदर्शनात आयोजित या मोफत औषध वितरण उपक्रमात श्रुती सदांशीव, किर्ती काळे, मीना लांडे, अश्विनी काळे, रेणुका झिरपे, ममता खंडारे, आशिष खिल्लारे, विनोद इंगळे, प्रवीण भोरे, नंदकिशोर गावंडे, आनंद गाढे, प्रवीण काळे, संतोष वक्ते, आकाश सूर्यवंशी, सागर शिंदे, विशाल धांडे आदींनी परिश्रम घेतले.

# जिल्ह्यात मुलींचाच वरचष्मा, निकाल 90.14 टक्के

### जिल्हा विभागात तिसऱ्या स्थानावर

प्रतिनिधी ३ मे

**अकोला:** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीने फेब्रुवारी व मार्चमध्ये घेण्यात आलेल्या बारावी परीक्षेचा निकाल शनिवार, २ मे रोजी ऑनलाईन जाहीर झाला. यामध्ये अकोला जिल्ह्याचा निकाल ९०.१४ टक्के लागला असून दरवर्षी प्रमाणे यंदाही मुलींचीच बाजी निकालात दिसून आली. तर विभागात जिल्हा तिसऱ्या स्थानावर गेला आहे. महत्त्वाचे म्हणजे गतवर्षीपेक्षा सहा टक्क्यांची वाढ निकालात झाली आहे.

जिल्ह्यातून बारावी परीक्षेसाठी १२ हजार ९१० मुले व ११ हजार ८१२ मुली असे एकूण २४ हजार ७२२ विद्यार्थी प्रविष्ठ होते. त्यापैकी ११ हजार १९३ मुले ११ हजार ९३ मुली असे एकूण २२ हजार २८६ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांची टक्केवारी ९०.१४ टक्के एवढी आहे. मुलींची टक्केवारी ९३.९१ टक्के असून मुलांची टक्केवारी ८६.७० टक्के आहे. मुलांच्या तुलनेत मुलींची टक्केवारी सात टक्क्यांनी अधिक आहे.

जिल्ह्यात विज्ञान शाखेचे ९६.९५ टक्के, वाणिज्य शाखा ९१.५१ टक्के, कला शाखा ७८.४५ टक्के, तर व्होकेशनल शाखा ६४.४९ टक्के लागला आहे.

विभागातील निकालाची टक्केवारी. बुलढाणा ९५. टक्के, वाशिम ९१.१५ टक्के, अकोला ९०.१४ टक्के, यवतमाळ ८९.६९ टक्के, अमरावती ८८.२६ टक्के.

## आदर्श कनिष्ठ महाविद्यालयाची यशस्वी निकालाची परंपरा कायम

प्रतिनिधी ३ मे

**अकोला:** जठारपेठ येथील आदर्श कनिष्ठ महाविद्यालयाचा इयत्ता बारावीचा सत्र २०२५-२६ चा निकाल यंदा १०० टक्के लागला असून महाविद्यालयाने उल्लेखनीय यश संपादन केले आहे. सर्व विद्यार्थी उत्तीर्ण झाल्यामुळे विद्यार्थ्यांसह पालक व शिक्षकांमध्ये आनंदाचे वातावरण आहे. महाविद्यालयातून इयत्ता बारावी ला एकूण ८९ विद्यार्थी परीक्षेला बसले होते सर्वच उत्तीर्ण झाले त्या पैकी १८ विद्यार्थी प्राविण्यश्रेणी उत्तीर्ण झाले आहेत.



संस्कृती विनायक पाठक ९४% हिने महाविद्यालयातुन प्रथम येण्याचा मान मिळवला आहे, समर्थ लक्ष्मीकांत रेलकर ८९.५० % महाविद्यालयातून द्वितीय क्रमांकाचे स्थान मिळवले आहे तर ऋजुता रमण घोगरे हीने ८९.१७% तृतीय क्रमांक पटकावला आहे. सर्व विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट यश मिळवून आगामी बारावीच्या विद्यार्थ्यांसमोर एक आदर्श निर्माण केला आहे. या यशामागे विद्यार्थ्यांची मेहनत, शिक्षकांचे मार्गदर्शन व संस्थेचे योग्य नियोजन कारणीभूत ठरले आहे. संस्थाध्यक्ष प्रा. विवेक डवरे, प्राचार्या डॉ. रक्षा डवरे यांनी विद्यार्थ्यांचे सन्मानचिन्ह देऊन सत्कार केला तसेच, सर्व शिक्षक प्रा. अंबादे, प्रा. पडगीलवार, प्रा. नावकार, प्रा. कोरडे, प्रा. डोईफोडे, प्रा. पाटील व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## न्यू इंग्लिश कनिष्ठ महाविद्यालयाची उत्कृष्ट निकालाची परंपरा कायम

प्रतिनिधी ३ मे

**अकोला:** स्थानिक न्यू इंग्लिश क.म.विद्यालयाने उत्कृष्ठ निकालाची परंपरा या वर्षी देखील कायम राखली असुन अमरावती बोर्डाच्या फेब्रु.२०२६ च्या १२ वीच्या परीक्षेत विज्ञान शाखेतुन कु. समृद्धी मनोज खांदेल प्रथम आली असून तिच्या गुणांची टक्केवारी ८७ % तर व कु. मुस्कान गांधीलाल गुप्ता हिने द्वितीय येण्याचा मान पटकविला तिच्या गुणांची टक्केवारी ८२.३३ % इतकी आहे.

कला शाखेतुन ऋषिकेश भगवान वानखडे प्रथम आला असून त्याच्या गुणांची टक्केवारी ८२ % आहे तर सुमित राजेंद्र ढगे हा द्वितीय क्रमांकाने उत्तीर्ण झाला असून त्याच्या गुणांची टक्केवारी ८१ % आहे.



तसेच वाणिज्य शाखेतुन किशोर दिनकर गाडे प्रथम आला असून त्याच्या गुणांची टक्केवारी ७९ % आहे तर रोहित नितेश खंडारे हा द्वितीय क्रमांकाने उत्तीर्ण झाला असून त्याच्या गुणांची टक्केवारी ७६% आहे. या परीक्षेत विज्ञान शाखेचा निकाल दरवर्षी प्रमाणे १०० % लागला असून, कला शाखेचा निकाल ८३% तर वाणिज्य शाखेचा निकाल ९३ % लागला आहे. विद्यार्थ्यांनी मिळविलेल्या या नेत्रदिपक व घवघवीत यशा बद्दल सर्वत्र त्यांचे कौतुक होत आहे. अकोला एज्युकेशन सोसायटी अकोला चे उपाध्यक्ष डॉ नानोटी सर, सचिव श्री शार्दुल दिगंबर सरांनी पुष्पगुच्छ देऊन विद्यार्थ्यांचे व पालकांचे अभिनंदन केले. तसेच कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य श्री माधव मुनशी, उप प्राचार्य श्री उदय हातवळणे, प्रभारी प्रा.अमोलकुमार बुटे, प्रा.थुटे, प्रा.कोल्हेकर, प्रा.रत्नपारखी, प्रा.महाजन, प्रा.पातुरकर, प्रा.मुळे, प्रा.काजळे यांनी विद्यार्थी व पालकांचे अभिनंदन केले. यशस्वी झालेल्या विद्यार्थ्यांनी त्यांच्या यशाचे श्रेय महाविद्यालयातील प्राध्यापकांच्या नियमीत मार्गदर्शन, सराव परीक्षा व वाचनालयाला दिले आहे.

## डवले कॉलेजचा बारावीचा १००% निकाल

### आशी गोयनका ९३.३३% गुणांसह बोर्डात सर्वप्रथम

प्रतिनिधी ३ मे

**अकोला:** डवले कॉलेजचा बारावी परीक्षेचा निकाल १०० टक्के लागला. सातत्यपूर्ण परिश्रम, योग्य मार्गदर्शन, नियमित सराव परीक्षा, परिपूर्ण नोट्स आणि विषय तज्ञांचे मार्गदर्शन यामुळे हे यश शक्य झाले आहे असे प्रतिपादन प्राचार्य प्रकाश डवले यांनी केले. कॉलेजची विद्यार्थिनी आशी मोहन कुमार गोयनका हिने ५६० गुण (९३.३३ %) मिळवत अमरावती बोर्डात प्रथम क्रमांक पटकावला आहे. तिच्या या यशामुळे कॉलेजची यशाची परंपरा अकोला शहरात कायम राखली आहे.

इतर गुणवंत विद्यार्थी तनिष्का नितीन सामल ५५८ गुण (९३%) राधिका नितीन देशमुख ५५६ गुण (९२.६७ %) फातिमा हकीमुद्दिन बट्टीवाला ५५६ गुण (९२.६७%) ज्ञानदा राजेश खुमकर ५५३ गुण (९२.१७%) संस्कृती संतोष नेमाडे ५५१ गुण (९१.८३%) निमिषा प्रसाद शिंपी ५४५ गुण (९०.८३ %) विशेष म्हणजे, डवले कॉलेजने २०२२, २०२३, २०२४ आणि २०२५ या सलग वर्षांमध्येही बोर्डात प्रथम येण्याची परंपरा कायम राखली आहे. दोन्ही शाखांमध्ये १००ञ् निकाल लागल्यामुळे आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. जेईई, निट परीक्षांबरोबरच बोर्ड परीक्षेतही डवले कॉलेजने आपली आघाडी सिद्ध केली आहे. मागील वर्षी विद्यार्थिनी अनुभा राठी हिने १००ञ् गुण मिळवत महाराष्ट्रात प्रथम येण्याचा मान मिळवला होता, ही बाबही अभिमानास्पद आहे. यशाबाबत प्राचार्य प्रकाश डवले सर यांनी सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन करत हे यश शिक्षक आणि विद्यार्थ्यांच्या संयुक्त परिश्रमाचे फलित असल्याचे सांगितले. तसेच सचिव मृणालिनी डवले मॅडम, संचालक डॉ. अभिजीत डवले आणि डॉ. आदित्य डवले, सौ प्राची धीनमीने, सौ. सविता धनोकार, सौ कविता बलिंगे, सौ वैशाली निवाने, सौ श्वेता तायडे, कु दिपाली चिकटे, वररुची खेडकर, सौ रजनी पांडे, सौ स्वाती बोरोडे, सौ श्रद्धा देशपांडे, सौ इतिका दुबे, कु. पारिजात पुनसे, सागर लोखंडे, श्याम सुलताने, किशोर स्वर्गे, शिक्षक तसेच शिक्षकेतर कर्मचारी यांनीही विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांच्या उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

विद्यार्थ्यांनी प्रथम आपले लक्ष/यश निश्चित करावे नंतर योग्य दिशेने योग्य प्रयत्न करावे. मोबाईलचा वापर कमी करावा केवळ ऑनलाईन अभ्यासावर अवलंबुन न राहता प्रिंटेड नोटस् नियमित सराव परीक्षा पेपर वेळेमध्ये सोडविण्याचे अचुक नियोजन अतिआत्मविश्वास न ठेवता शांतपणे ध्येय निश्चीत करावे. आई वडील, नातेवाईक, गुरुजन यांचा आदर करावा व यशोप्राप्ती नंतरच त्याचा विजय साजरा करावा असा सल्ला प्रा. प्रकाश डवले यांनी दिला.


## निधन वार्ता

### मोतीरामजी रौंदळे



**बाळापूर :** तालुका पत्रकार संघाचे माजी अध्यक्ष दीपक रौंदळे यांचे वडील मोतीरामजी गणपत रौंदळे, ८८, यांचे २८ रोजी निधन झाले. महावितरण मध्ये अभियंता पदापर्यंत त्यांनी मजल मारली होती. त्यांच्या पश्चात ४ मुले आणि मोठा आप्त परिवार आहे. मोतीरामजी रौंदळे यांच्या निधनाबद्दल तालुका पत्रकार संघ, राजकीय पक्षांचे पदाधिकारी आणि मित्रपरिवाराने शोक व्यक्त केला.

### सतीश राऊत



**हिवरखेड:** प्रेस क्लबचे माजी अध्यक्ष तसेच हिवरखेड एज्युकेशन अँड सोशल वेल्फेअर सोसायटीचे संस्थापक सचिव सतीशभाऊ राऊत यांचे हृदयविकाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात मोठा आप्तपरिवार आहे.

## अकोला चान्नी पोलिसांच्या सतर्कतेमुळे ४ बालकांचे बालविवाह रोखण्यात यश!

### जिल्हा बाल संरक्षण कक्ष, चाईल्ड लाईन आणि 'ॲसेस टू जस्टीस' संस्थेची कारवाई

प्रतिनिधी ३ मे

**मूर्तिजापूर:** शिक्षणाचा अभाव, गरिबी आणि जुन्या रूढी-परंपरांच्या विळख्यात अडकून अल्पवयीन मुला-मुलींचे लग्न लावून देण्याचा पालकांचा डाव चान्नी पोलीस स्टेशन आणि जिल्हा बाल संरक्षण पथकाच्या सतर्कतेमुळे उधळून लावण्यात आला आहे. चान्नी पोलीस स्टेशन अंतर्गत येणाऱ्या एका गावातून ४ अल्पवयीन बालकांचे (२ मुले व २ मुली) बालविवाह होणार असल्याची गोपनीय माहिती मिळताच प्रशासनाने तातडीने धाव घेत ही धडक कारवाई केली. गोपनीय माहितीवरून पथक गावात दाखलङ

चाईल्ड लाईन १०९८ आपत्कालीन सेवा आणि '?सेस टू जस्टीस' आय.एस.डब्ल्यू.एस. अकोला यांना गावात बालविवाह होत असल्याची गोपनीय माहिती मिळाली होती. या माहितीच्या आधारे चाईल्ड लाईन समन्वयक हर्षाली गजभिये, 'ॲसेस टू जस्टीस'चे जिल्हा समन्वयक शंकर वाघमारे आणि ग्रामपंचायत अधिकारी सुनील इंगळे यांनी तातडीने घटनास्थळ गाठले.



चौकशी दरम्यान, पालकांनी आपली बिकट आर्थिक परिस्थिती, शिक्षणाचा अभाव आणि जुन्या चालीरीती यामुळे मुला-मुलींचे विवाह लावून देण्याचा निर्णय घेतल्याचे कबूल केले पालकांचे समुपदेशन आणि कायदेशीर इशाराङ

या घटनेचे गांभीर्य ओळखून सर्व पालकांना ग्रामपंचायत कार्यालयात एकत्र बोलावून त्यांचे समुपदेशन करण्यात आले.

'बालविवाह प्रतिबंधक अधिनियम २००६' नुसार लग्नासाठी मुलीचे वय १८ वर्षे आणि मुलाचे वय २१ वर्षे पूर्ण असणे अनिवार्य आहे.

शिक्षणाचे महत्त्व सांगून बालविवाहामुळे बालकांच्या आरोग्यावर आणि भविष्यावर होणाऱ्या गंभीर दुष्परिणामांची जाणीव करून देण्यात आली.

दंडात्मक कारवाई बालविवाह घडवून आणल्यास, लावून दिल्यास किंवा त्यात सहभागी झाल्यास २ वर्षांचा कारावास आणि १ लाख रुपये दंडाची तरतूद असल्याचे पथकाने स्पष्ट केले.

दोन्ही पक्षांकडून लिहून घेतले हमीपत्र बाल कल्याण समितीच्या अध्यक्ष व सदस्यांनी दोन्ही पक्षांची संयुक्त बैठक घेऊन पालकांना कडक इशारा दिला. यानंतर, वधू आणि वर पक्षाकडील वऱ्हाडी व पालकांकडून ठमुले कायदेशीर वयाची होईपर्यंत त्यांचे लग्न लावणार नाही, ठ असे लेखी हमीपत्र लिहून घेण्यात आले. यावेळी ग्राम बाल संरक्षण समिती आणि ग्रामपंचायत बालविवाह प्रतिबंधक अधिकारी यांची साक्ष नोंदवण्यात आली. या' क्रमांकांवर संपर्क साधण्याचे आवाहन प्रशासनाने नागरिकांना आवाहन केले आहे की, परिसरात कुठेही बालविवाह होत असल्याचे आढळल्यास तात्काळ खालील क्रमांकांवर संपर्क साधावा. चाईल्ड लाईन १०९८, पोलीस मदत कक्ष ११२ बचपन बचाव आंदोलन १८००-१०२-७२२२

प्रशासकीय पथकाची जिल्हा महिला व बालविकास अधिकारी लक्ष्मण हगवणे यांच्या मार्गदर्शनाखाली, जिल्हा बाल संरक्षण अधिकारी राजू लाडुलकर, ग्रामपंचायत अधिकारी सुनील इंगळे, चाईल्ड लाईन समन्वयक हर्षाली गजभिये, जिल्हा प्रकल्प समन्वयक शंकर वाघमारे, सुपरवायझर विधा उंबरकर आणि ग्राम बाल संरक्षण समितीच्या पथकाने अत्यंत तत्परतेने ही कारवाई पूर्ण केली. त्यांच्या या कामगिरीचे सर्वत्र कौतुक होत आहे.

## जि.प. मराठी शाळा व भोपळे विद्यालयात महाराष्ट्र दिन साजरा

प्रतिनिधी ३ मे

**हिवरखेड :** येथे विविध शाळा कॉलेज मध्ये महाराष्ट्र दीन साजरा करण्यात आला असून गावातील सहदेवराव भोपळे विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय येथे दिनांक १ मे २०२६, शुक्रवार रोजी महाराष्ट्र दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी शालेय अभ्यासिका उद्घाटन, विद्यार्थ्यांचा गौरव तसेच वार्षिक परीक्षेचा निकाल जाहीर करण्यात आला.



याप्रसंगी सुप्रसिद्ध उद्योजक नंदकिशोर शेगोकार यांच्या हस्ते राष्ट्रध्वज वंदन संपन्न झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष अनिलकुमार भोपळे होते. प्रास्ताविकात संस्थेचे कार्यवाह श्यामशील भोपळे यांनी महाराष्ट्र दिनाचे महत्त्व सांगत विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी योग्य वातावरण मिळावे या उद्देशाने 'गुरु-शिष्य अभ्यासिका' उभारण्यात आल्याचे स्पष्ट केले. या दिनाचे औचित्य साधून शाळेचा वार्षिक निकाल जाहीर करण्यात आला. तसेच शाळेच्या माजी प्राचार्या रजनी वालोकार (सदाफळे) यांच्या संकल्पनेतून यावर्षीचे 'आदर्श विद्यार्थी' म्हणून सार्थक आकोटे व प्राची व्यवहारे यांना मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. विविध स्पर्धात्मक परीक्षांमध्ये यश मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांचाही यावेळी गौरव करण्यात आला.

'निपुण महाराष्ट्र' चाचणी यशस्वीपणे राबविल्याबद्दल शिक्षक प्रवीण सोनुने यांचा विशेष सन्मान करण्यात आला. यावेळी संस्थेचे अध्यक्ष अनिलकुमार भोपळे यांच्या हस्ते कार्यवाह-सहकार्यवाह कक्षाचे उद्घाटन, तर नंदकिशोर शेगोकार यांच्या हस्ते शाळा परिसरातील 'गुरु-शिष्य अभ्यासिका'चे उद्घाटन करण्यात आले.

या कार्यक्रमाला संस्थेचे उपाध्यक्ष डॉ. प्रमोद भोपळे, ज्येष्ठ संचालिका अन्नपूर्णाबाई बंड, साधनाताई भोपळे, सहकार्यवाह स्नेहल भोपळे, संचालक प्रकाशचंद्र खोब्रागडे, शिवशंकर मार्के, प्रा. कौस्तुभ भोपळे, विनोद कडू आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. शंकर दूनघव व डॉ. मयूर लहाने यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्राचार्य संतोषकुमार राऊत, पर्यवेक्षक गणेश खानझोडे, ज्येष्ठ शिक्षक रंजीत राठोड यांच्या मार्गदर्शनाखाली शिक्षक-शिक्षिका व कर्मचारी वर्गाने परिश्रम घेतले.

## कामगार दिनी बांधकाम कामगारांचा सत्कार व मार्गदर्शन

प्रतिनिधी ३ मे

**अकोला:** कामगार दिनी छत्रपती शिवाजी महाराज नगर, खडकी येथे बांधकाम कामगार बांधवांचा सत्कार व मार्गदर्शन सोहळा शुक्रवार, २ मे रोजी सकाळी उत्साहात पार पडला.

आमदार रणधीर सावरकर यांच्या मार्गदर्शनात व खासदार अनुप धोत्रे यांच्या प्रमुख उपस्थितीत कार्यक्रम झाला. यावेळी प्रभाग २० च्या नगरसेविका सौ. सोनालीताई अंधारे, विनोदजी मापारी, सौ. शारदा ढोरे, गणेशभाऊ अंधारे, वैकुंठराव ढोरे, प्रभाग प्रमुख विद्याधरजी काकड, मंडळ प्रमुख गोपाल भाऊ मुळे, मंगेश झिने यांच्यासह भाजपा खडकी मंडळाचे सर्व पदाधिकारी, बूथ प्रमुख, शक्ती केंद्र प्रमुख व निष्ठावंत कार्यकर्ते उपस्थित होते.




खासदार अनुप धोत्रे म्हणाले, कामगार हाच देशाच्या विकासाचा केंद्रबिंदू आहे. श्रमिकांच्या घामातूनच राष्ट्र उभे राहते. मोदीजींच्या नेतृत्वात कामगार कल्याणाच्या योजना राबवल्या जात आहेत.ङ्क

आमदार रणधीर सावरकर म्हणाले, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नव्या संसद भवनाचे बांधकाम करणाऱ्या कामगारांचा प्रथम सत्कार करून आदरयुक्त सन्मान केला. त्याच प्रेरणेतून आज आपण बांधकाम कामगार बांधवांचा सन्मान करत आहोत. अकोला पूर्वचा सर्वांगीण विकास हेच माझे ध्येय आहे.

यावेळी उपस्थित कामगारांची प्रत्यक्ष रजिस्टर नोंदणी करण्यात आली व नोंदणीकृत बांधकाम कामगार लाभार्थ्यांना सेफ्टी किट व इसेनशियल किटचे वाटप करण्यात आले.

कार्यक्रमाला अंबादास उमाळे, विवेक भरणे, पंकज कांबे, शंकरराव बोरकर, गोपाल फुंडकर, वैभव माहोरे, जयदादा ठोकळ, संतोष बाभुळकर, गणेश बुजाळे, प्रीतम देशमुख, श्रीराम भोंगरे, प्रवीण डिक्कर, संतोष देशमुख, गणेश गावंडे, धीरज वाटाणे, अंकित श्रावगी, ओम बापू देशमुख, विकास पवार, राहुल सावदेकर आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन शाम राऊत व प्रास्ताविक गणेशजी अंधारे यांनी केले. बांधकाम कामगार सनियंत्रण समितीच्या वतीने सर्वांचे आभार मानले.

समर्थ शिक्षण प्रसारक मंडळ व्दारा संचालित एफ ५२२६
माँ. गायत्री प्राथमिक शाळा व स्व. प्रकाश देशमुख माध्यमिक विद्यालय
गायत्री नगर. अकोला
आम्ही गुणवत्ता पाहून प्रवेश देत नाही तर, प्रवेश घेणाऱ्या प्रत्येकामध्ये गुणवत्ता निर्माण करतो!
वैशिष्ट्ये :
- अनुभवी शिक्षकवृंद
- सुसज्ज पायाभूत ईमारत
- दर्जेदार अभ्यासक्रमासोबत नाविण्यपूर्ण उपक्रम
- सर्व पुस्तकांनी युक्त वाचनालय
- आनंददायी शिक्षण पध्दती
- CCTV ची सुविधा
- कला, संस्कृती, क्रिडा विद्यार्थ्यांच्या सर्वांगीन विकासावर भर
- सुसज्ज प्रयोगशाळा
इयत्ता १ ली ते १० वी साठी प्रवेश देणे सुरु आहे.
- इयत्ता १ ली ते ८ वी च्या विद्यार्थ्यांना मोफत गणवेश
- इयत्ता १ ली ते १० वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना मोफत बससेवा उपलब्ध
- शालेय पोषण आहार

मॉ गायत्री प्राथमिक शाळा व स्व. प्रकाश देशमुख विद्यालय
मो. ९९२११८६७१५, ९५११२५४९५९, ९४२१८९५७९०, ९९६०४३७३६६

सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ
रविवार, दि. ३ मे २०२६
https://epaper.citynewssuperfast.com

# यवतमाळ जिल्ह्याचा बारावीचा निकाल 89.69%

प्रतिनिधी ३ मे



**यवतमाळ :** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने शनिवारी (२ मे) जाहीर केलेल्या बारावी परीक्षेच्या निकालात यवतमाळ जिल्ह्याने ८९.६९ टक्के निकालाची नोंद केली. यंदाही मुलींनी मुलांपेक्षा सरस कामगिरी करत 'टॉपर'चा मान पटकावला आहे. निकाल जाहीर होताच जिल्ह्यातील यशस्वी विद्यार्थ्यांनी जल्लोष साजरा केला.

जिल्ह्यातून एकूण ३३ हजार ७४५ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. त्यापैकी ३३ हजार ४३६ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. यात १७ हजार ५७५ मुलगे आणि १५ हजार ८६१ मुलींचा समावेश होता. एकूण २९ हजार ९८९ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. मुलींचा निकाल ९३.४१ टक्के लागला असून १५ हजार ८६१ पैकी १४ हजार ८१६ मुली उत्तीर्ण झाल्या. तर मुलांचा निकाल ८६.३३ टक्के असून १७ हजार ५७५ पैकी १५ हजार १७३ मुलांनी यश मिळवले. त्यामुळे जिल्ह्यात पुन्हा एकदा मुलींची सरशी अधोरेखित झाली. तालुकानिहाय निकालात उमरखेड (९५.९४%) तालुका अव्वल ठरला आहे. त्यापाठोपाठ महागाव (९५.८०%), बाभूळगाव (९५.८६%) आणि पुसद (९५.५३%) यांनी उच्च निकाल नोंदवला. आर्णी (९४.४०%) व दारव्हा (९२.४४%) यांनीही चांगली कामगिरी केली. दुसरीकडे, कळंब (७८.१७%), पांढरकवडा (७७.९३%), वणी (७५.२१%), मारेगाव (७५.५५%) आणि राळेगाव (७३.८०%) या तालुक्यांचा निकाल तुलनेने कमी राहिला. राळेगाव तालुका जिल्ह्यात सर्वात कमी निकाल राहिला. एकूणच, यंदाच्या निकालात मुलींचे वर्चस्व कायम राहिले असून जिल्ह्याचा निकाल समाधानकारक मानला जात आहे. शिक्षण क्षेत्रात सातत्याने वाढत असलेली गुणवत्ता आणि विद्यार्थ्यांचा वाढता कल यामुळे निकालात ही सकारात्मक प्रवृत्ती दिसून येत असल्याचे शिक्षणतज्ज्ञांचे मत आहे.

# देवराव पाटील उच्च माध्यमिक विद्यालय आर्णीचा बारावीचा ९२ टक्के निकाल

प्रतिनिधी ३ मे

## समिक्षा बनकर ८६.६७ घेऊन प्रथम





**आर्णी :** स्थानिक देवराव पाटील उच्च माध्यमिक विद्यालय आर्णी यांचा बारावीचा निकाल नुकताच जाहीर झाला त्यामध्ये कॉलेज मधुन ३६ विद्यार्थ्यांनी परिक्षा दिली त्यापैकी ३३ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असुन त्यांची उत्तीर्ण टक्केवारी ९१.६६ टक्के आहे यामध्ये दाभडी येथील समिक्षा महेंद्र बनकर हिने ८६. ६७ टक्के गुण मिळवून कॉलेज मधुन पहिला येण्याचा मान मिळविला. तर संजीवनी कृष्णा इंगळे हिला ७३.३३ गुण घेऊन द्वितीय आली. तर शिवम विवेक आडे ह्याला ७० टक्के गुण मिळवून तृतीय क्रमांक पटकावला. एकुण ८ विद्यार्थी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत. उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचे सर्वत्र कौतुक होत असुन विद्यार्थी आपल्या यशाचे श्रेय संस्थेचे अध्यक्ष मनिष पाटिल, उपाध्यक्ष सुशिलाताई पाटिल, प्राचार्य झिबल उदार, प्रा. जितेंद्र उमरे, प्रा. अपर्णा तुळजापूरे, प्रा. शितल डवले, प्रा. उर्वशी चौधरी यांना दिले.

# श्री शिवाजी उच्च माध्यमिक विद्यालयाची निकालाची परंपरा कायम

प्रतिनिधी ३ मे

## विज्ञान शाखा ९४. २३% तर कला शाखा ९०.४७% निकाल

**पुसद :** स्थानिक श्री शिवाजी उच्च माध्यमिक विद्यालय पुसद यांनी नुकत्याच जाहीर झालेल्या महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे फेब्रुवारी/मार्च २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा वर्ग १२ वी चा निकाल ऑनलाईन जाहीर झाला असून या निकालाची उज्वल परंपरा कायम राखली आहे.

विज्ञान शाखेचा ९४.२३% तर कला शाखेचा ९०.४७% निकाल लागलेला असून कला शाखेतून कु. छकुली मांगीलाल पवार ७८.६७% -प्रथम क्रमांक ,कु. अवंतीका आनंदा जाधव ७८% - द्वितीय क्रमांक तर कु. ऋतुजा संजय राठोड ७४.५०% - तृतीय क्रमांक आणि विज्ञान शाखेतून समाधान सुरेश राठोड ७२.८३% -प्रथम क्रमांक कु. काजल देवानंद चव्हाण ६९.६७% -द्वितीय क्रमांक कु. प्रथमेश बालाजी हुडेकर ६९.३३% -तृतीय क्रमांक प्राप्त करून घवघवीत यश संपादन केले आहे. कला शाखेमध्ये प्राविण्य श्रेणी मध्ये ३, प्रथम श्रेणीमध्ये १८ तर विज्ञान शाखेमध्ये प्रथम श्रेणामध्ये १८ विद्यार्थ्यांनी स्थान पटकावले आहे. सर्व यशस्वी गुणवान विद्यार्थ्यांचे श्री शिवाजी शिक्षण संस्था पुसद चे अध्यक्ष अनिरुद्ध पाटील चोंढीकर, सचिव अश्विनी पाटील चोंढीकर यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

प्राचार्य रामचंद्र हिरवे, उपमुख्याध्यापक दत्तात्रय जीवने, पर्यवेक्षक प्रज्ञा गडदे तथा सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

# ब्राम्हणगांव येथील श्री.तेजमल गांधी कनिष्ठ विज्ञान महाविद्यालयाचे बारावीच्या परीक्षेत घवघवीत यश

प्रतिनिधी ३ मे




**उमरखेड :** तालुक्यातील श्री. शिवाजी शिक्षण संस्था पुसद द्वारा संचालित श्री. तेजमल गांधी कनिष्ठ विज्ञान महाविद्यालय ब्राह्मणगांव तालुका उमरखेड येथून महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे फेब्रुवारी/मार्च २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा वर्ग १२ वी चा निकाल ऑनलाईन जाहीर झाला असून या निकालाची उज्वल परंपरा कायम राखली आहे.

विज्ञान शाखेचा 98.95 % निकाल लागलेला असून विज्ञान शाखेतून अर्णव महेश पानपट्टे 89.33 % -प्रथम क्रमांक, कु. श्रावणी संदीप पाटील 88.33 % - द्वितीय क्रमांक तर कु. जानवी विलास पसलवाड 87.66% - तृतीय क्रमांक प्राप्त करून घवघवीत यश संपादन केले आहे.

विज्ञान शाखेमध्ये प्राविण्य श्रेणी मध्ये 39, प्रथम श्रेणीमध्ये 111 विद्यार्थ्यांनी स्थान पटकावले आहे. सर्व यशस्वी गुणवान विद्यार्थ्यांचे श्री. शिवाजी शिक्षण संस्था पुसद चे अध्यक्ष अनिरुद्ध पाटील चोंढीकर, सचिव अश्विनी पाटील चोंढीकर यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. सोबतच श्री. तेजमल गांधी कनिष्ठ विज्ञान महाविद्यालयाचे चेअरमन डॉ. विजयराव पंजाबराव माने साहेब व आमच्या मार्गदर्शिका सन्माननीय सौ. अर्चनाताई विजयराव माने यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या प्राचार्य विष्णू नागोराव सादुडे, पर्यवेक्षक हरी राजाराम खोकले तथा आमचे समन्वयक भुवनेश्वर गावंडे सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

# वैशाख पर्णिमेला अवतरली 'बुध्द पहाट'

प्रतिनिधी ३ मे




**यवतमाळ :** महाकारूणिक तथागत भगवान गौतम बुद्ध यांच्या २५७० व्या जयंतीनिमित्त अनामी फाउंडेशन यवतमाळ तर्फे संविधान चौक येथे बुध्द पहाट कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमास मोठ्या संख्येने यवतमाळकर उपस्थित होते.यवतमाळ शहरातील सर्व धम्म बंधुंनी या कार्यक्रमास भरभरून प्रतिसाद दिला.

कार्यक्रमाची सुरवात पहाटे 4.45 वाजता भंते रठ्ठपाल यांच्या हस्ते महावंदना घेऊन उपस्थितांना धम्मदेसना देण्यात आली. तद्नंतर सुप्रसिद्ध गायिका आकांक्षा नगरकर व संच नागपूर यांनी यवतमाळकरांना त्यांच्या सुमधुर गायनाने भुरळ घातली. दिलरुबा, बासरी व इतर वाद्यांच्या जुगलबंदीने उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. अखेरपर्यंत कार्यक्रम रंगतदार झाला. समारोपिय खिरदान सम्यक ॲडव्हान्सड ऑर्थोपेडीक अँड मॅटर्निटी हॉस्पिटल तर्फे करण्यात आले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अनामी फाउंडेशनच्या सर्व सदस्यांनी अथक परिश्रम घेतले.

# प्रशासकीय उदासीनतेमुळे 'हळद क्लस्टर' ठप्प

प्रतिनिधी २ मे



**उमरखेड :** यवतमाळ जिल्ह्यातील उमरखेड तालुक्यात उभारण्यात येत असलेला महत्त्वाकांक्षी 'हळद प्रक्रिया क्लस्टर' प्रकल्प जिल्हा उद्योग केंद्राच्या (DIC) कथित ढिसाळ कारभारामुळे ठप्प झाल्याचा आरोप करण्यात आला आहे.

प्रशासकीय स्तरावर स्पष्ट मार्गदर्शन व लेखी सूचना न मिळाल्याने 'विडालय हळद प्रक्रिया क्लस्टर असोसिएशन'चे कामकाज थांबले असून, संतप्त असोसिएशनने आमरण उपोषणाचा इशारा दिला आहे.

विदर्भातील हळद उत्पादक शेतकऱ्यांना बाजारपेठ व मूल्यवर्धनाची संधी उपलब्ध करून देण्यासाठी हा सामूहिक सुविधा केंद्र (CFC) प्रकल्प उभारण्यात येत आहे. मात्र, जिल्हा उद्योग केंद्राच्या महाव्यवस्थापकांकडून जाणीवपूर्वक अडथळे निर्माण केले जात असल्याचा आरोप असोसिएशनने केला आहे. परिणामी, प्रकल्पाची गती मंदावली असून शेतकरी व लघुउद्योजक आर्थिक अडचणीत सापडले आहेत.

३ जुलै २०२५ रोजी डीपीआर संदर्भात झालेल्या बैठकीत संबंधित अधिकाऱ्यांनी कोणताही तांत्रिक किंवा आर्थिक अहवाल न घेता प्रकल्प अव्यवहार्य ठरवणारा ठराव मांडल्याचे असोसिएशनचे म्हणणे आहे. या निर्णयाला हरकत घेत संस्थेने जिल्हाधिकाऱ्यांकडे लेखी तक्रार केली होती. २८ एप्रिल २०२६ रोजी सादर केलेल्या निवेदनाची दखल घेत जिल्हाधिकारी कार्यालयाने संबंधित विभागाला तातडीने कार्यवाही करण्याचे निर्देश दिले आहेत.

तथापि, वारंवार पत्रव्यवहार करूनही जिल्हा उद्योग केंद्राकडून प्रतिसाद न मिळाल्याने प्रकल्पाची प्रगती रखडली आहे.

त्यामुळे संतप्त झालेल्या असोसिएशनने तीव्र आंदोलनाचा इशारा दिला आहे. याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तातडीने हस्तक्षेप करावा, अशी मागणी करण्यात आली आहे. तसेच पालकमंत्री, उद्योग सचिव, जिल्हाधिकारी आणि अमरावती विभागाचे उद्योग संचालक यांनाही निवेदनाच्या प्रती पाठवण्यात आल्या आहेत.

दरम्यान, या प्रकरणाची गंभीर दखल घेत जिल्हाधिकारी कार्यालयातील नायब तहसीलदार छाया काळे यांनी जिल्हा उद्योग केंद्राला पत्र पाठवून तातडीने कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या आहेत.

अर्जदाराला उपोषणापासून परावृत्त करण्याचेही निर्देश देण्यात आले असून, पत्राची प्रत पोलीस अधीक्षकांना पाठवण्यात आली आहे.

### प्रकल्पाचे संभाव्य फायदे


- या प्रकल्पामुळे हळद वाळवण्याची प्रक्रिया २०–२५ दिवसांवरून केवळ २४–३० तासांमध्ये पूर्ण होणार आहे. स्वच्छ व आधुनिक तंत्रज्ञानामुळे उत्पादनाला आंतरराष्ट्रीय दर्जा मिळण्याची शक्यता आहे. 'NCDEX'सारख्या प्लॅटफॉर्मद्वारे शेतकऱ्यांना थेट बाजारपेठेशी जोडले जाणार असून, उकडणे, वाळवणे, घासणी, पावडर आणि पॅकेजिंग या मूल्यवर्धित प्रक्रियांमुळे प्रति टन सुमारे ३० हजार रुपयांपर्यंत अतिरिक्त उत्पन्न मिळू शकते. सांगली येथे अशाच प्रकारचा प्रकल्प कार्यान्वित असून वसमत येथील हरिद्रा संशोधन केंद्रातही तो सुरू होण्याच्या मार्गावर आहे. त्यामुळे उमरखेडमधील प्रकल्प रखडल्याबद्दल शेतकरी वर्गात नाराजी व्यक्त होत आहे.

# आर्णी येथील नामांकीत श्री.म.द.भारती कनिष्ठ महाविद्यालयाची उज्वल यशाची परंपरा कायम

प्रतिनिधी ३ मे

## आर्णी तालुक्यातुन विज्ञान व कला शाखेतील विद्यार्थी प्रथम








**आर्णी :** आर्णी येथील श्री दत्त प्रासादिक शिक्षण प्रसारक मंडळ, आर्णी व्दारा संचालित श्री म. द.भारती कनिष्ठ महाविद्यालय, आर्णी यांनी नुकत्याच झालेल्या सत्र २०२५-२०२६ एच. एस.सी च्या परीक्षेत यश संपादन करून उज्वल यशाची परंपरा कायम ठेवली आहे. श्री.म.द.भारती भारती कनिष्ठ महाविद्यालयातील विज्ञान शाखेचा निकाल १०० टक्के, वाणिज्य शाखेचा ९६.०० टक्के व कला शाखेचा ९१.६६ टक्के निकाल लागला असून यामध्ये विज्ञान शाखेतुन प्रथम कु. परी प्रशांत वानखडे हीला ८७.५०टक्के, व्दितीय श्रवण रूपेश नामदेववार हयाला ८३.५० टक्के व तृतीय कु. प्राची शंकर राठोड ८२.८३ टक्के व वाणिज्य शाखेतुन प्रथम कु. जागृती संजय जयस्वाल ८७.५० टक्के, व्दितीय कु. महेक परविन अनवर सैयद ८५.००टक्के, तृतीय आदित्य अरविंद राठोड ८४.८३टक्के, तसेच कला शाखेतुन प्रथम कु. रिज्जल इंदल चव्हाण ९२.६७ टक्के, व्दितीय कु. आकांक्षा ज्ञानेश्वर पिंपळकर ७९.५० टक्के व तृतीय कु. प्रज्ञा गजानन बोदडे ७८.३३ टक्के हे अनुक्रमे गुण घेवून उत्तीर्ण झाले.

हे विद्यार्थी आपल्या यशाचे श्रेय संस्था अध्यक्षा डॉ. किरणताई भारती, उपाध्यक्ष इंजि. समृध्द भारती, सचिव ॲड. सिध्दार्थ भारती, कोषाध्यक्ष प्रियदर्शनजी भारती, संचालीका अश्विनीताई भारती, श्री.म.द. भारती कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य अमोल जगताप, उपप्राचार्य दिलीप नन्नावरे, पर्यवेक्षक प्रफुल वानखडे, रूपेश नामदेववार तसेच प्राध्यापक, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच आई वडीलांना देतात.


## भारती मैंद नागरी सहकारी पतसंस्था मर्या. पुसद,

रजी.नं.वाय.एम.एल/ (पी.एस.डी)/आर.एस.आर/ (सि.आर)/६७७/२००१/२००२ कार्यालय - 'जगदंबा अपार्टमेंट' मोतीनगर पुसद (०७२३३)२४५८७१

### -: जाहिर सुचना :-

भारती मैंद नागरी सहकारी पतसंस्था मर्या. पुसदच्या श्रीरामपूर व दिग्रस शाखा येथील खाली नमुद केलेल्या थकीत कर्जदारांविरुद्ध पतसंस्थेने महाराष्ट्र राज्य सहकारी संस्थेचा कायदा १९६० चे कलम १०१ अंतर्गत सक्तीने वसुली करण्याचे प्रमाणपत्र मिळविलेले असुन, त्या नुसार सर्वाना कायदेशीर नोटीसेस सुद्धा दिलेल्या आहेत. वारंवार सुचना देऊन सुद्धा थकबाकीचा भरणा केलेला नाही. त्यामुळे सर्व थकबाकीदारांना सुचित करण्यात येते की, सदर सुचना प्रसिद्धी पासुन ८ दिवसांचे आत आपणाकडे असलेली थकबाकीची रक्कम भरणा करावी अन्यथा जंगम अथवा स्थावर मालमत्ता जप्त करुन विक्रीची कार्यवाही करण्यास येईल यांची नोंद घ्यावी.

| अ. क्र. | थकबाकीदाराचे नाव व पत्ता | वसुली दाखला क्रमांक व दिनांक | दि.३०/०३/२०२६ अखेर येणे बाकी |
|---|---|---|---|
| १. | श्री. गजानन तुकाराम राठोड<br>मु, पो जनुना ता उमरखेड, जि. यवतमाळ | ३०५७/२०१७<br>दि.११/११/२०१७ | रु.३,३०४४९<br>दि. ३०/०३/२०२६ पासुनचे व्याज |
| २. | चंदाबाई पुनंचंद चरावंडे<br>रा. नवलबाबा वार्ड, पुसद ता. पुसद जि. यवतमाळ | २४९२ /२०१८<br>दि. २९/११/२०१८ | रु.१,२१,८९९<br>दि.३०/०३/२०२६ पासुनचे व्याज |
| ३. | श्री. उल्हास रेडा राठोड<br>रा.बा ना अभियांत्रिकी महाविद्यालय पुसद ता. पुसद जि.यवतमाळ | ३०५१/२०१७<br>दि.११/१२ / २०१७ | रु.३,३४,३३९<br>दि.३०/०३/२०२६ पासुनचे व्याज |
| ४. | श्री गणेश शंकर चिकणे<br>रा. धन्केश्वर नगर श्रीरामपूर, पुसद ता. पुसद जि. यवतमाळ | २३००/२०१८<br>दि. ३१/१०/२०१८ | रु.३,८४,९७८<br>दि.३०/०३/२०२६ पासुनचे व्याज |
| ५. | शारदा गोपाल पवार<br>मु लोभिवंत निवासी अपंग विद्यालय, पार्डी ता.पुसद जि. यवतमाळ | १३३६/२०१४<br>दि. १२/०९/२०१४ | रु.१,७७,६८२ दि.३०/०३/२०२६ पासुनचे व्याज |
| ६. | श्री सुरेश विन्ष्णू वाथे<br>मु.लोबिवंत निवासी अपंग विद्यालय पार्डी ता. पुसद जि. यवतमाळ | १३२१ /२०१४<br>दि. १२ /०९/२०१४ | रु.२.९३,८१५<br>दि.३०/०३/२०२६ पासुनचे व्याज |
| ७. | श्री सुनील रामचंद्र हरणे<br>मु,आदर्श नगर, श्रीरामपुर पुसद ता. पुसद जि.यवतमाळ | १७२२ /२०१५<br>दि. २४/०८/२०१५ | रु.९४,२०९<br>दि.३०/०३/२०२६ पासुनचे व्याज |
| ८. | श्री मो आरिफ मो शरीक शेख<br>रा. वसंतराव नाईक प्रा आश्रम शाळा फुलउम्ब्री ता मनोरा जि. वाशीम. | १३५/२०१८<br>दि.३१/०१/२०१८ | रु.२,६२,३८३ दि.३०/०३/२०२६ पासुनचे व्याज |
| ९. | श्री माधव देवराव सुर्वे<br>मु. देवनगर इसापूर रोड दिग्रस ता. दिग्रस जि. यवतमाळ. | ९१२ /२०१८<br>दि.२९/०५/२०१८ | रु.३,०१,०५१ दि.३०/०३/२०२६ पासुनचे व्याज |
| १०. | श्री स्वप्नील विनायकराव बोंडगे<br>रा. ताज नगर दिग्रस ता दिग्रस जि यवतमाळ. | २०१७ /२०१८<br>दि. ३०/११/२०१८ | रु.१,९५,०५१ दि.३०/०३/२०२६ पासुनचे व्याज |
| ११. | आचल अशोकजी माहुरे<br>मु पो काठोडा ता.आर्णी जि.यवतमाळ. | ९४० /२०१८<br>दि २९/०५/२०१८ | रु.३,५४,००१ दि.३०/०३/२०२६ पासुनचे व्याज |

दिनांक :- ०३/०५/२०२६

गजानन आर. नाकाडे
वसुली अधिकारी
भारती मैंद नागरी सहकारी पतसंस्था मर्या. पुसद
मुख्य शाखा, पुसद


# घरफोडीतील फरार आरोपी जेरबंद; लाखोंचा मुद्देमाल जप्त

प्रतिनिधी ३ मे




**यवतमाळ :** घरफोडीच्या गुन्ह्यातील फरार आरोपीला ताब्यात घेत स्थानिक गुन्हे शाखेने आणखी एका घरफोडीचा छडा लावत मोठे यश मिळवले आहे. या कारवाईत सुमारे ९ लाख ३० हजार ३०८ रुपयांचा सोन्या-चांदीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. स्थानिक गुन्हे शाखेने ही कारवाई केली. मारेगाव पोलीस ठाण्यातील गुन्हा क्र. 142/2026 (कलम 303(1) भा.न्या.सं.) प्रकरणातील फरार आरोपी नथ्थू नागू कुरकुटे (वय ३०, रा. मोहदरी, ता. उमरखेड, जि. यवतमाळ) हा पोलिसांच्या रडारवर होता. दिनांक १ मे २०२६ रोजी तो पुसद–उमरखेड मार्गावरील कोपरा फाटा परिसरात असल्याची खात्रीलायक माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी सापळा रचून त्याला ताब्यात घेतले. ताब्यात घेतल्यानंतर अंगझडतीमध्ये आरोपीकडे सोन्या-चांदीचे दागिने आढळून आले. चौकशीत त्याने दत्ता कुरकुटे (रा. नागवाडी) तसेच दोन विधीसंघर्षित बालकांसह मारेगाव येथून घरफोडी केल्याची कबुली दिली. तपासादरम्यान हा मुद्देमाल मारेगाव पोलीस ठाण्यातील गुन्हा क्र. 160/2026 (कलम 305(अ) भा.न्या.सं.) शी संबंधित असल्याचे निष्पन्न झाले. जप्त मुद्देमालात विविध सोन्या-चांदीचे दागिने असून त्याची एकूण किंमत ९,३०,३०८ रुपये इतकी आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक कुमार चिंता, अपर पोलीस अधीक्षक अशोक थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सतीश चवरे, पथकात सपोनि दत्ता पेंडकर, पोउपनि धनराज हाके, तसेच पोलीस अंमलदार सुनिल खंडागळे, सुधीर पांडे, सुभाष जाधव, संतोष भोरगे, तेजाब रणखांब, रजनिकांत मडावी, चालक सतीश फुके यांनी केली.

सिटी न्यूज अमरावती

रविवार, दि. ३ मे २०२६

http://epaper.citynewssuperfast.com

# पोलिसांनी पकडला जुगार

**अमरावती :** ०२ मे रोजी पोस्टे बडनेरा हद्दीमध्ये गुन्हे शाखेचे पथक पेट्रोलिंग करीत असताना रत्नदिप दाभाडे रा बेलोरा, अमरावती हा बडनेरा आठवडी बाजार येथील सोनु मोबाईल चे मागील बाजुस सार्वजनिक ठिकाणी वरली जुगारच्या चिट्ठ्यासह हारजीत खेळताना दिसला. त्याच्याकडून नगदी ४३२० व साहित्य असा ४३३०ङ/- रु चा मुद्देमाल जप्त करण्यात आला.तसेच फरार आरोपी मिलिंद झंजाळ,शेख शब्बीर शेख बशीर,करीम लाला वरीर सर्व रा. नवी वस्ती, बडनेरा त्यांच्या विरुद्ध पोस्टे बडनेरा येथे १२ (अ) महाराष्ट्र जुगार कायदा सहकलम ४९ भा.न्या.सं प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला.



# विद्यापीठात सेवा गौरव पुरस्कारप्राप्त व स्पर्धेतील विजेत्यांचा कुलकुरूंच्या हस्ते सत्कार

प्रतिनिधी ३ मे

**अमरावती :** संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचा त्रेचाळीसावा वर्धापन दिन, महाराष्ट्र दिन व आंतरराष्ट्रीय कामगार दिनाचे औचित्य साधून उत्कृष्ट सेवा गौरव पुरस्कार २०२६ व वार्षिकांक स्पर्धा २०२४-२५ चे पुरस्कार कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांचे शुभहस्ते प्रदान करण्यात आले. यावेळी व्यासपीठावर प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. हेमंत देशमुख, आंतरविद्याशाखीय अभ्यास विद्याशाखेच्या अधिष्ठाता डॉ.सौ. वैशाली गुडधे, मानवविज्ञान विद्याशाखेच्या अधिष्ठाता डॉ.सौ. मोना चिमोटे व जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर उपस्थित होते.



उत्कृष्ट सेवा गौरव पुरस्कारांतर्गत शाल, श्रीफळ, सन्मानपत्र व १०० ग्रॅम चांदीचे पदक देवून कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी संलग्नित महाविद्यालयातील प्राचार्य/संचालक स्तरावरील संवर्गात उत्कृष्ट शैक्षणिक कार्याबद्दल इंदिरा महाविद्यालय, कळंबचे प्राचार्य डॉ. पवन भाऊ मांडवकर यांचा, संलग्नित महाविद्यालयातील शिक्षक संवर्गात गो.सी. टोम्पे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, चांदुरबाजार येथील प्राध्यापक तथा रसायनशास्त्र विभागप्रमुख डॉ. नंदकिशोर दिनकरराव गव्हाळे व श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालय, अमरावती येथील प्राध्यापक तथा प्राणीशास्त्र विभागप्रमुख डॉ. जयश्री दिपक धोटे यांचा, विद्यापीठ स्तरावरील शिक्षक संवर्गात विद्यापीठाच्या गृहविज्ञान विभागातील प्राध्यापक डॉ. संयोगिता विलास देशमुख यांचा, विद्यापीठ प्रथम श्रेणी अधिकारी संवर्गात परीक्षा विभागातील सहा. कुलसचिव मिलींद देशपांडे व महाविद्यालयीन विभागातील सहा. कुलसचिव डॉ. साक्षी ठाकूर यांचा, विद्यापीठ द्वितीय श्रेणी अधिकारी संवर्गात आस्थापना विभागातील अधीक्षक अमोल म्हैसाळकर व परीक्षा विभागातील अधीक्षक सौ. स्मिता म्हैसाळकर यांचा, विद्यापीठ तृतीय श्रेणी कर्मचारी संवर्गात वित्त विभागातील वरीष्ठ सहाय्यक संजय कोकाटे व ज्ञानस्रोत केंद्रातील ग्रंथालय सहाय्यक ज्योती गेडाम यांचा, विद्यापीठ चतुर्थ श्रेणी कर्मचारी वर्गवारीत सामान्य प्रशासन विभागातील चौकीदार मोरेश्वर मुंजाळे यांचा आणि संलग्नित महाविद्यालयातील सर्व स्तरावरील शिक्षकेतर कर्मचारी संवर्गात इंदिराबाई मेघे महिला महाविद्यालय, अमरावती येथील अधीक्षक प्रशांत देशमुख यांचा, तर नाविन्यपूर्ण उपक्रमासाठी भगवंतराव शिवाजी पाटील महाविद्यालय, परतवाडा महाविद्यालयाची 'एन.ई.पी. स्कूल कनेक्ट' या वार्षिकांकाकरीता महाविद्यालयाचा रु. ५००१/- रोख पारितोषिक व प्रशस्ती प्रमाणपत्र देवून कुलगुरूंनी सत्कार केला.

वार्षिकांक स्पर्धा २०२४-२५ मधील विजेत्या महाविद्यालयांचा कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांचे हस्ते पारितोषिके देऊन सत्कार करण्यात आला. यामध्ये शहरी विभागातील बिगर व्यावसायिक गटातून प्रथम पारितोषिक श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालय, अमरावतीच्या 'क्रिएशन' या वार्षिकांकास, व्दितीय डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय, अमरावतीच्या 'प्रज्ञासूर्य' या वार्षिकांकास, तर तृतीय भारतीय महाविद्यालय, अमरावतीच्या 'भारती' या वार्षिकांकास, तर ग्रामीण विभागात बिगर व्यावसायिक गटात प्रथम इंदिरा महाविद्यालय, कळंबच्या 'कदंबिनी' व कला व वाणिज्य महाविद्यालय, बोरी अरबच्या 'अंतरंग' या वार्षिकांकास, द्वितीय गो.सी. टोम्पे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, चांदुरबाजारच्या 'फुलोर' या वार्षिकांकास, तर तृतीय आदर्श विज्ञान, जयरामदास भागचंद कला व बिर्ला महाविद्यालय, धामणगांव रेल्वेच्या 'गुलमोहोर' या वार्षिकांकास आणि शहरी व ग्रामीण विभागातील व्यावसायिक गटात प्रथम पी.आर.पोटे (पाटील) कॉलेज ऑफ इंजिनिअरींग ॲन्ड मॅनेजमेंट, अमरावतीच्या 'पोटेन्शिअल' या वार्षिकांकास, द्वितीय डॉ. राजेंद्र गोडे इन्स्टिट्युट ऑफ टेक्नॉलॉजी ॲंड रिसर्च, घातखेड, अमरावतीच्या 'टेक्नो-रिदम' या वार्षिकांकास, तर तृतीय प्रो. राम मेघे कॉलेज ऑफ इंजिनिअरींग ॲन्ड मॅनेजमेंट, बडनेराच्या 'टेक्नो-स्ट्रीम' या वार्षिकांकास पारितोषिक व स्मृतिचिन्ह देवून कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी विजेत्या महाविद्यालयांच्या प्राचार्यांना व त्यांच्या प्रतिनिधींना गौरवान्वित केले.

गाडगे बाबांच्या प्रतिमेचे पूजन, वंदे मातरम्, राष्ट्रगीत, महाराष्ट्र गीत व विद्यापीठ गीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली. कायक्रमाचे संचालन करीत आभार जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर यांनी मानले.

# भारतीय महाविद्यालयाचा विज्ञान शाखेचा ९७.६७ टक्के निकाल

प्रतिनिधी ३ मे

**अमरावती:** इयत्ता बारावीच्या परीक्षेचा निकाल जाहीर झाला. या निकालात राजापेठ येथील भारतीय महाविद्यालयाने यंदाही उल्लेखनीय यश संपादन करत आपल्या गुणवत्तेची परंपरा कायम राखली आहे. महाविद्यालयाचा एकूण निकाल २२.०५ टक्के लागला असला, तरी विज्ञान शाखेने तब्बल ९७.६७ टक्के निकाल लावत सर्वांचे लक्ष वेधून घेतले आहे.

महाविद्यालयाच्या विविध शाखांनुसार पाहता विज्ञान शाखा आघाडीवर असून कला शाखेनेही ८७.५० टक्क्यांसह समाधानकारक कामगिरी केली आहे. वाणिज्य शाखेचा निकाल ५२.६३ टक्के, तर एमसीव्हीसी विभागाचा निकाल ७२.७० टक्के



लागला आहे. या सर्व निकालांमुळे महाविद्यालयातील शैक्षणिक दर्जा आणि विद्यार्थ्यांच्या परिश्रमाचे प्रतिबिंब स्पष्टपणे दिसून येते.

यंदाच्या निकालात विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांनी विशेष प्रावीण्य मिळवत गुणवत्तेची उंची गाठली आहे. आर्या प्रदीप सांगले हिने ८८.६७ टक्के गुण मिळवत प्रथम क्रमांक पटकावला, तर तनुश्री विनोद शेबे (८७.१७ %) आणि तनुश्री राजेंद्र काळेकर (८३%) यांनी अनुक्रमे दुसरा व तिसरा क्रमांक मिळवला. पियुष सुमेध गजभिये (८१.८३ %), श्रावणी दीपक सातवकर(८०.८३ %) आणि समृद्धी मनोहर भुते (७९.६७ %) यांनीही उल्लेखनीय यश संपादन केले.

कला शाखेत अदिती प्रकाश कुकडे हिने ६८.६७ टक्के गुणांसह प्रथम क्रमांक मिळवला. दिव्या आर. वायधने (६८ %) आणि गौरव एम. श्रीवास्तव (६३.८३ %) यांनी अनुक्रमे दुसरा व तिसरा क्रमांक पटकावला. वाणिज्य शाखेत जानवी मुकेश टाले हिने ६५ टक्के गुणांसह प्रथम क्रमांक मिळवला.

या यशामध्ये सामाजिक समावेशकतेचेही दर्शन घडते. पियुष सुमेध गजभिये याने अनुसूचित जाती प्रवर्गातून ८१.८३ टक्के गुण मिळवत उल्लेखनीय यश मिळवले, तर अदिती प्रकाश कुकडे हिने दिव्यांग प्रवर्गातून ६८.६७ टक्के गुण मिळवत कला शाखेत प्रथम क्रमांक मिळवला. त्यामुळे महाविद्यालयाने गुणवत्तेसोबतच समावेशक शिक्षणाची परंपरा जोपासल्याचे दिसून येते.

महाविद्यालयाच्या या यशाबद्दल भारतीय विद्या मंदिर संस्थेच्या अध्यक्षा तथा प्राचार्या डॉ. आराधना वैद्य यांनी आनंद व्यक्त करत विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. विद्यार्थ्यांची चिकाटी, प्राध्यापकांचे समर्पित मार्गदर्शन आणि पालकांचे सहकार्य यामुळेच हे यश शक्य झाले असल्याचे त्यांनी नमूद केले. ङ्घविद्यार्थ्यांनी आपल्या मेहनतीने महाविद्यालयाचे नाव उज्ज्वल केले आहे. त्यांच्या पुढील वाटचालीस मनःपूर्वक शुभेच्छा,ङ्ग असे सांगत त्यांनी विद्यार्थ्यांना प्रेरित केले.

यावेळी प्राचार्यांनी कला शाखेच्या प्रा. लता वैद्य, विज्ञान शाखेच्या प्रा. रुपाली भागवतकर आणि वाणिज्य शाखेचे डॉ. सुशील गावंडे यांच्यासह सर्व प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे विशेष कौतुक केले. तसेच प्रा. नेहा वर्मा, प्रा. अंकिता नाहे, प्रा. दीक्षा मेश्राम, प्रा. हेमंत बेलोकार, प्रा. संतोष घासले, प्रा. स्वप्निल वानखडे आदी प्राध्यापकांनीही यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

# गुरुदेव सेवाश्रमात ग्रामजयंती साजरी

प्रतिनिधी ३ मे

**अमरावती:** गुरुदेव सेवाश्रम ट्रस्ट राधानगर अमरावती येथे महाराष्ट्रदिन, कामगार दिन, बौद्धपौर्णिमा व ग्रामजयंती असा संयुक्त कार्यक्रम संपन्न झाला. समारंभाच्या अध्यक्षस्थानी गुरुदेव सेवाश्रम ट्रस्ट चे अध्यक्ष ज्येष्ठ साहित्यिक डॉ. सतीश तराळ हे होते. सकाळी पाच वाजता डॉ.जावरकर व सौ प्रतिभाताई जावरकर यांच्या शुभहस्ते तीर्थस्थापना करण्यात आली. साडेपाच वाजता सामुदायिक ध्यान होऊन सामुदायिक ध्यानावर श्री बाबुरावजी धोटे यांचे भाषण झाले. साडेसहा वाजता गाडगे नगर परिसरातून ग्रामगीताचार्य रामदासजी गायकवाड यांचे मार्गदर्शनात रामधून काढण्यात आली. रामधुनच्या महत्त्वावर



ग्रामगीताचार्य आशाताई धारपवार मॅडम यांनी चिंतन प्रस्तुत केले. साडेनऊ वाजता ह. भ. प. अभियंता दिनकर चोरे यांचे काल्याचे कीर्तन झाले. साडेअकरा वाजता ग्रामजयंती, महाराष्ट्रदिन, कामगारदिन व बुद्धपौर्णिमा, यानिमित्त डॉ. मोना चिमटे अधिष्ठाता संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, डॉ. दिलीप काळे अध्यासन प्रमुख संत गाडगेबाबा अध्यासन संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, गोरखनाथ जाधव वरिष्ठ पोलीस निरीक्षक पोलीस स्टेशन गाडगे नगर,एडवोकेट दिलीप कोहळे ,सदस्य अखिल भारतीय गुरुदेव सेवा मंडळ मोझरी सौ सुरेखाताई लुंगारे नगरसेवक अमरावती महानगरपालिका या अतिथींची भाषणे झाली. अध्यक्षस्थानी डॉ सतीश तराळ होते. याप्रसंगी पुरुषोत्तमराव गावंडे, डॉ. शोभाताई गायकवाड. श्री बसवणनाथे,श्री. चंदनसिंग राजपूत यांचा सत्कार करण्यात आला. सत्कारमूर्तींनी सत्कारमूर्तींनी सत्काराला समयोजित उत्तरे दिली.

# महाराष्ट्र दिनी भातकुली तहसील येथे आ. रवी राणा यांच्या हस्ते ध्वजारोहण

प्रतिनिधी ३ मे

**अमरावती:** महाराष्ट्र दिनानिमित्त भातकुली तहसील कार्यालय येथे आमदार रवी राणा यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. देशभक्तीच्या वातावरणात पार पडलेल्या या कार्यक्रमात मोठ्या संख्येने नागरिक, अधिकारी व मान्यवर उपस्थित होते.

यावेळी बोलताना आमदार रवी राणा यांनी महाराष्ट्र दिनाचे महत्त्व अधोरेखित करत सांगितले की, ङ्घमहाराष्ट्राच्या विकासामध्ये प्रत्येक महाराष्ट्रीयन नागरिकांचा सिंहाचा वाटा आहे. राज्याच्या प्रगतीसाठी सर्वांनी एकत्रितपणे योगदान देणे गरजेचे आहे.ङ्ग त्यांनी महाराष्ट्राच्या समृद्ध परंपरेचा उल्लेख करत



नागरिकांना विकासाच्या दिशेने एकजुटीने काम करण्याचे आवाहन केले.

कार्यक्रमाला तहसिलदार श्री. अक्षय मांडवे, नगर पंचायतचे मुख्याधिकारी, भातकुलीचे पोलीस निरीक्षक, नगराध्यक्षा योगीता कोलटेके, नायब तहसिलदार तसेच इतर अधिकारी व पदाधिकारी यांची प्रमुख उपस्थिती होती.

या प्रसंगी आमदार रवी राणा यांच्या हस्ते माजी सैनिक, जेष्ठ नागरिक तसेच नवविवाहित जोडप्यांचा (नवरदेव-नवरी) शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. समाजातील विविध घटकांचा गौरव करताना त्यांच्या योगदानाची दखल घेण्यात आली.

कार्यक्रमात राष्ट्रगीताने समारोप करण्यात आला. महाराष्ट्र दिनानिमित्त आयोजित या कार्यक्रमामुळे उपस्थितांमध्ये देशभक्ती व अभिमानाची भावना अधिक दृढ झाल्याचे दिसून आले.

यावेळी श्री.प्रतिक कांडलकर,सौ.दिपाली रविंद्र गावंडे,शंकर डोंगरे,सौ.अर्चना राजेश ठोंबरे,सौ शिल्पा प्रविण राठी, श्री.पुरुषोत्तम सदाशिव खर्चान, सौ. सोनाली संतोषराव शिंदे,सौ. निवेदिता प्रविण पवार,श्री. खान खलील अब्दुल्ला,श्री. सतीश शंकरराव आठवले,मोहम्मद नाहिद अंजुम सद्दाम, श्री. सुनिल भोपसे,स्वाती संजय बुध, श्री संजय सोळंके, सौ. अंजना सुधीर वरखडे,अंकुश ज्ञानेश्वर पवार,गिरीष रामकिसनजी,संतोष मधुकर शिंदे व नवरदेव नवरी यांचे सत्कार केले वर. राजेश कावरे वधू सौ दीपाली कावरे आदि उपस्थित होते.

# व्हीजेटीआय मुंबई आणि क्राकोव तंत्रज्ञान विद्यापीठ पोलंड यांच्यात संशोधन सहकार्य अधिक बळकट

प्रतिनिधी ३ मे

**अमरावती :** भारतातील नामवंत अभियांत्रिकी संस्था (VkTI) आणि पोलंडमधील Krakow Universitye of Technology (CUT) यांच्यात संशोधन व तंत्रज्ञान क्षेत्रातील द्विपक्षीय सहकार्य अधिक मजबूत करण्यासाठी क्राकोवमधील वारशाव्स्का-२४ कॅम्पसमध्ये महत्त्वपूर्ण बैठक आयोजित करण्यात आली.

या बैठकीचे आयोजन क्राकोव येथील भारताच्या मानद वाणिज्य दूतावासाने आणि पोलंडमधील भारतीय दूतावासाच्या सहकार्याने करण्यात आले. या बैठकीत दोन्ही विद्यापीठांतील प्राध्यापक,



वैज्ञानिक आणि वाणिज्य दूतावासाचे प्रतिनिधी सहभागी झाले होते.

सुमारे एका तासाच्या चर्चेत औद्योगिक प्रकल्प, संशोधन व विकास धोरणे आणि भविष्यातील सहकार्याच्या संधी यांवर सखोल चर्चा झाली. सहभागी सदस्यांनी ही चर्चा भारत आणि पोलंड यांच्यात संशोधन तसेच दोन्ही देशांतील विद्यार्थ्यांच्या दृष्टीने अत्यंत फलदायी ठरल्याचे नमूद केले.

या वेळी संशोधन निधीच्या संधी, विद्यार्थी देवाणघेवाण कार्यक्रम, इंटर्नशिप संधी आणि विज्ञान व नवोन्मेष क्षेत्रातील भारत-पोलंड संयुक्त उपक्रमांच्या अंमलबजावणीवर विशेष चर्चा झाली. विशेषतः आयओटी (घ्ह्रीहू र्द ऊप्हे) आधारित तंत्रज्ञान आणि स्वच्छ ऊर्जा क्षेत्रात सहकार्य वाढविण्यावर भर देण्यात आला.

बैठकीदरम्यान क्राकोवमधील भारताच्या मानद वाणिज्य दूत अलेक्झांद्रा ग्लोद-अहमद यांचे विद्यापीठाच्या उपकुलगुरू, अधिष्ठाता आणि प्राध्यापकांनी स्वागत केले.

व्हीजेटीआयचे प्रा. नितीन परशराम गुल्हाणे यांना पोलंडमध्ये व्हिजिटिंग प्रोफेसर म्हणून आमंत्रित करण्यात आले आहे, त्यांनी २०१७ पासून दोन्ही संस्थांदरम्यान असलेल्या सामंजस्य कराराअंतर्गत राबविण्यात येणाऱ्या संशोधन प्रकल्प, प्रकाशने आणि विविध उपक्रमांची उपस्थितांना सादरीकरण केले.

# अपघातमुक्त दर्यापूर साठी पुढाकार; कृषी उत्पन्न बाजार समितीचा स्तुत्य उपक्रम

◆ जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी लाभ घ्यावा - सभापती सुनील पाटील गावंडे यांचे आवाहन

प्रतिनिधी ३ मे

**दर्यापूर:** कृषी उत्पन्न बाजार समिती, दर्यापूर यांच्या वतीने अपघात सुरक्षा अभियान अंतर्गत एक महत्त्वपूर्ण जनजागृती कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. हा कार्यक्रम सोमवार, दि. ४ मे २०२६ रोजी सकाळी ९.३० वाजता कृषी उत्पन्न बाजार समितीच्या मुख्य प्रवेशद्वार समोर पार पडणार आहे.

स्वातंत्र्य संग्राम सैनिकांच्या स्मृतिप्रीत्यर्थ तसेच स्व. सैनिक भैय्यासाहेब उर्फ बळवंत ना. देशमुख यांच्या स्मृतीपर्वानिमित्त या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. ङ्घशेतकऱ्याचा प्रत्येक जीव अमूल्यङ्ग या उदात्त हेतूने वाहनांवर रेडियम पट्टी लावण्याचा उपक्रम राबविण्यात येणार आहे. विशेषतः बैलगाडी, ट्रॅक्टर व इतर शेतीवाहनांवर रेडियम लावून अपघात टाळण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे.

या कार्यक्रमात शेतकरी-चालकांचा महिंद्रा अँड महिंद्रा शोरूम सोहम कलोत्री यांच्या वतीने शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात येणार आहे. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून अमरावती जिल्ह्याचे खासदार मा. बळवंत भाऊ वानखडे, दर्यापूर तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष सुधाकर पाटील भारसाकळे तसेच दर्यापूर पोलीस स्टेशनचे मा. सुनील वानखडे उपस्थित राहणार आहेत.

कार्यक्रमाचे आयोजन कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती, उपसभापती व सर्व संचालक मंडळ यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात येत असून, स्वातंत्र्य संग्राम कृती समितीचे अध्यक्ष मा. विजयभाऊ विल्हेकर यांचे विशेष सहकार्य लाभत आहे.

दरम्यान, महेंद्र ट्रॅक्टर यांच्या सहकार्याने सर्व्हिसिंग व लेबर चार्जेस मोफत करण्यात येणार असून, महेंद्र ट्रॅक्टरतर्फे ढोल ताशांच्या गजरात वाहनांचे स्वागत करण्यात येणार आहे. या उपक्रमाचा जास्तीत जास्त शेतकरी व वाहनचालकांनी लाभ घ्यावा, व कृषी उत्पन्न बाजार समितीच्या वतीने ना नफा न तोटा या तत्वावर समिती कडून इंजिन ऑइल उपलब्ध करून देण्यात येणार आहे तसेच महिंद्रा शोरूम कडून शेतकऱ्यांन करिता चहा नाष्टाची व्यवस्था करण्यात आली आहे असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे.

# पी. आर. पोटे पाटील कनिष्ठ महाविद्यालयाची बारावी निकालात गरुड झेप

प्रतिनिधी ३ मे

**अमरावती :** पी. आर. पोटे पाटील कनिष्ठ महाविद्यालयाने बारावीच्या मार्च २०२५-२६ राज्य मंडळ परीक्षेत शंभर टक्के निकालाची परंपरा कायम राखत पुन्हा एकदा उज्ज्वल यश संपादन केले आहे. यावर्षी परीक्षेला बसलेल्या एकूण २३४ विद्यार्थ्यांपैकी सर्व विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून महाविद्यालयाच्या गुणवत्तेची साक्ष अधोरेखित झाली आहे.

या निकालात ८० ते ९० टक्के गुण मिळवत एकूण २१ विद्यार्थ्यांनी विशेष प्राविण्य मिळवले. त्यामध्ये रुद्राक्षी रणजीत मोहोड ९५.१७ज्ञ् हिने प्रथम क्रमांक पटकावला असून नंदिनी विनोद साबळे ९०.३३ज्ञ् हिने द्वितीय, तर ईश्वरी हर्षराज डफडे ८८.३३% हिने तृतीय क्रमांक मिळवला. त्यानंतर ऋतुजा नंदकिशोर अनासने

◆ शंभर टक्के निकालाची परंपरा कायम



८७.३३%, सौम्या सचिन जमदार ८६.३३%, मिष्टी रवी बसंतवाणी ८६.१७ %, ओम अनिल धावक ८५.१७ % , शर्वरी राजेश खाजोणे ८५.१७% , मयुरेश चंद्रशेखर पोटे ८५.००%, स्वरूपा नितीन देशमुख ८३.५०% ,श्रेयस राजकुमार जाधव ८३.३३% ,ऋषिकेश मुकुंद काबरा ८३.३३%, यश संजयराव नागपुरे ८३.१७ %, मैथिली अजय पाटील ८२.८३ %, सिद्धी राजीव राजस ८२.३३%, उत्कर्ष संजय गुल्हाने ८१.८३%, दिपांकर रवींद्र तिखाडे ८१.३३% , साची विकास डोंगरे ८०.६७% , मेघ तुषार वरणगावकर ८०.५०% ,श्रुती शरद गांधी ८०.१७% , शताक्षी विलास सातपुते ८०.००% गुण घेऊन यांनीही उल्लेखनीय यश मिळवले.


विद्यार्थ्यांच्या या यशामागे त्यांची जिद्द, सातत्यपूर्ण अभ्यास, पालकांचे सहकार्य आणि शिक्षकांचे मार्गदर्शन महत्त्वाचे ठरले. महाविद्यालयातील सर्व शाखांतील विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट कामगिरी करत संस्थेचा शैक्षणिक दर्जा पुन्हा अधोरेखित केला आहे.

या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष प्रवीण पोटे पाटील व उपाध्यक्ष श्रेयशदादा पोटे पाटील यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. तसेच प्राचार्य, उपप्राचार्य व सर्व शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचेही कौतुक करण्यात आले.

संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले की, विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास, दर्जेदार शिक्षण, नियमित सराव परीक्षा, वैयक्तिक मार्गदर्शन आणि शिस्तबद्ध वातावरण यामुळेच हे घवघवीत यश शक्य झाले आहे.

महाविद्यालयाच्या या दैदिप्यमान यशामुळे अमरावती शहरासह परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून सर्वत्र अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम
रविवार दि ३ मे २०२६ http://epaper.citynewssuperfast.com




मंगळवार दि २१ एप्रिल २०२६ http://epaper.citynewssuperfast.com
रिसोडच्या डॉ. अल्लमा इकबाल उर्दू शाळेतील गैरप्रकार चव्हाट्यावर!
मंगळवार दि २८ एप्रिल २०२६ http://epaper.citynewssuperfast.com
नात्यातील व्यक्तींलाच नोकरी देण्याचा करार !
* रमीज खान आणि अलीम खान यांची एसआयटीकडे तक्रार
*रिसोडच्या अल-हिलाल अल्पसंख्यांक शिक्षण संस्थेचा अफलातून फंडा
पदभरतीची बंदी, संस्थाने साधली संधी !
* रक्ताच्या नात्यातील १० लोकांची नियुक्ती; अल-हिलाल च्या संस्थातेली प्रकार
* माध्यमिक शिक्षण विभागाच्या कृपादृष्टीने कथित सचिवाची भरभराट
* शिक्षण विभागातील झारीतील शुक्राचार्याच्या संगनमताने नियमबाह्य नियुक्त्या
* अन्यायग्रस्त रमीज खान व अलीम खान यांची एसआयटीकडे तक्रार
•सिटी न्युज ब्युरो @ वाशीम•
रिसोड येथील गैरप्रकारात आघाडीवर असलेल्या अल- हिलाल अल्पसंख्यांक शिक्षण प्रसारक व समाज कल्याण संस्थेच्या कथित सचिवाने त्या संस्थेद्वारा संचालीत प्राथमिक, माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शाळांमध्ये शासनाचे पदभरतीबाबतची बंदी असतानाही वाशीमच्या माध्यमिक शिक्षण विभागातील तत्कालीन भ्रष्ट अधिकाऱ्यांच्या
'त्या' तक्रारीची सखोल चौकशी व्हावी

# संस्था चालक पैशासाठी लाचार, अल-हिलाल कथित संस्थेत भ्रष्टाचार!

•सिटी न्युज ब्युरो @ वाशीम•

रिसोड येथील गैरप्रकारात आघाडीवर असलेल्या अल-हिलाल अल्पसंख्यांक शिक्षण प्रसारक व समाज कल्याण संस्थेचे कथित सचिव मोहम्मद कबीर मोहसीन आणि त्यांचा मुलगा वकार अहमद कबीर मोहसीन यांनी त्यांच्या संस्थेद्वारा संचालीत शाळा, कनिष्ठ महाविद्यालयात पदभरतीसह अनेक गैरप्रकार करून कोट्यवधीची स्थावर व जंगम संपत्ती जमा केली आहे. ही मालमत्ता त्यांच्या कमाईपेक्षा अनेक पटीने जास्त आहे. त्यांच्या संपूर्ण मालमत्तेची आणि त्यांनी केलेल्या करचोरीची आयकर विभागामार्फत सखोल चौकशी करण्याची मागणी तक्रारकर्ते व अन्यायग्रस्त रमीज खान यांनी एसआयटीला दिलेल्या तक्रारीत केली आहे.

* सचिव आणि त्यांच्या मुलाकडे असलेल्या अपसंपदेची आयकर विभागाने चौकशी करावी
* तक्रारकर्ते रमीज खान यांची एसआयटी कडे मागणी
* बोगस पदभरतीतून बापलेकांनी केली कोट्यवधीची कमाई
* पैशाच्या लोभाने शालेय पोषण आहाराची काळ्याबाजारात विक्री
* माध्यमिक शिक्षण विभागातील भ्रष्ट अधिकाऱ्यांच्या संगनमताने कथित संस्थासचिवाने जमा केली कोट्यवधीची 'अपसंपदा'.

राज्यात काँग्रेसची सत्ता असताना मार्च २००३ मध्ये कथित संस्था सचिव कबीर मोहसीन हे 'सिमी' या प्रतिबंधीत संघटनेसाठी देशविरोधी कारवाया करत असल्याच्या प्रकरणामध्ये पोलीसांनी अटक केली होती. त्यावेळी सुद्धा कथित सचिवाला काही व्हाईट कॉलर मंडळीने राजाश्रय देवून ती कारवाई थांबवण्यासाठी पुढाकार घेतल्याची चर्चा आहे. त्यानंतर 'या' नटवरलाल ने शिक्षण संस्थेमध्ये समाजातील गरजू, होतकरू, पात्रताधारक उमेदवारांना डावलून स्वत:च्या आप्तेष्ठांच्या नियमबाह्य नियुत्त्या करून ईतर पात्र उमेदवारांवर अन्याय करून स्व-कल्याणाचा मार्ग धरला. या गोरखधंद्यातून कथित संस्था सचिव आणि त्यांचा मुलगा वकार अहमद यांनी त्यांच्या संस्थेद्वारा संचालीत सर्व शाळा, कनिष्ठ महाविद्यालयामध्ये नियमबाह्य नियुत्त्या करून कोट्यवधीची माया जमा केल्याचा आरोपही तक्रारकर्त्यांनी वरिष्ठांना दिलेल्या तक्रारीत केला आहे. तसेच या जोडीने त्यांच्या संस्थेत मुस्लीम समाजातील शिक्षक पदासाठी पात्र असलेल्या गरजू



उमेदवारांकडून लाखो रूपयाचे डोनेशन घेतले. त्या उमेदवारास काही महिने, एखादे वर्ष अध्यापनाचे कार्य करू द्यायचे, नंतर त्यांच्या कुटुंबातील, रक्ताच्या संबंधातील दुसऱ्या उमेदवाराची माध्यमिक शिक्षण विभागातील भ्रष्ट अधिकाऱ्याच्या संगनमताने पुन्हा नियमबाह्य नियुक्ती करून लाखो रूपयाचे डोनेशन घेवून त्या काळ्या पैशातून स्थावर व जंगम मालमत्ता जमा करण्याचा अभिनव फंडा सुरू केल्याची माहिती तक्रारकर्त्यांनी वरिष्ठांना दिलेल्या तक्रारीत दिली आहे. आयकर विभागाच्या अधिकाऱ्यांनी अल-हिलाल चे कथित संस्थाचालक असलेल्या बाप-लेकांनी वाममार्गाने जमा केलेल्या अपसंपदेची व आजपर्यंत केलेल्या करचोरीची सखोल चौकशी करून त्यांचेविरोधात कठोर कारवाई करण्याची मागणीसुद्धा तक्रारकर्त्यांनी एसआयटीकडे केली आहे.

## थोडक्यात

### विश्वशांतीचा संदेश देणारा बुद्ध जयंती महोत्सव

•सिटी न्युज ब्युरो @ वाशीम•



करुणा, समता व बंधुत्वाचा संदेश देणारे गौतम बुद्ध यांच्या जयंतीनिमित्त वाशिम शहरात गुरुवारी 'विश्वशांती बुद्ध जयंती महोत्सव-२०२६' उत्साहात साजरा झाला. नवीन आय.यू.डी.पी. कॉलनी येथे आयोजित या महोत्सवाला मोठ्या संख्येने धम्म उपासक-उपासिकांची उपस्थिती लाभली. सकाळच्या धार्मिक कार्यक्रमांपासून सायंकाळच्या भव्य शोभायात्रेपर्यंत संपूर्ण परिसर धम्ममय झाला होता. सकाळी आठ वाजता समितीचे अध्यक्ष दिलीप बागडे व उपाध्यक्ष प्रा. मनोहर तायडे यांच्या हस्ते पंचशील ध्वजारोहण करण्यात आले. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर पुतळा परिसर येथे शोभायात्रेचा समारोप झाला. यावेळी सामूहिक बुद्ध वंदना, खीरदान व खिचडी वाटप करण्यात आले. शांतता, समता व बंधुत्वाचा संदेश देणारा हा महोत्सव वाशिमच्या सामाजिक ऐक्याचा प्रत्यय देणारा ठरला.

### य.च .महाविद्यालयात खुल्या व्यायामशाळेचे उद्घाटन



•सिटी न्युज ब्युरो @ मंगरूळपीर•

स्थानिक यशवंतराव चव्हाण कला व विज्ञान महाविद्यालय, मंगरूळपीर येथे आज खुल्या व्यायामशाळेचे (ओपन जिम) उद्घाटन उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाले. श्री मोतीरामजी ठाकरे शिक्षण प्रसारक मंडळ, कासोला यांचे सचिव तथा माजी जिल्हा परिषद अध्यक्ष, वाशीम आदरणीय चंद्रकांत दादासाहेब ठाकरे यांच्या शुभहस्ते उद्घाटन पार पडले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राहुल सुर्वे होते. यावेळी कला विभागाचे पर्यवेक्षक डॉ. वाघोडे, विज्ञान विभागाचे पर्यवेक्षक डॉ. इंगळे तसेच महाविद्यालयाचे प्रभारी शारीरिक शिक्षण संचालक व पर्शियन विभागप्रमुख डॉ. सय्यद रमीज सर प्रमुख उपस्थित होते. या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी आदरणीय चंद्रकांत दादासाहेब ठाकरे यांच्या प्रेरणेने व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राहुल सुर्वे यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. सय्यद रमीज सय्यद वसीम यांनी विशेष परिश्रम घेतले. उपस्थित मान्यवरांनी महाविद्यालयात उभारण्यात आलेल्या या खुल्या व्यायामशाळेचे कौतुक करत विद्यार्थ्यांच्या आरोग्य व सर्वांगीण विकासासाठी हा उपक्रम अत्यंत उपयुक्त असल्याचे मत व्यक्त केले.

### जिल्हा परिषदेत महाराष्ट्रदिना निमित्त ध्वजारोहण

•सिटी न्युज ब्युरो @ वाशीम•

महाराष्ट्र दिन व जागतिक कामगार दिनानिमित्त जिल्हा परिषदेत मुख्य कार्यकारी अधिकारी अर्पित चोहान यांच्या हस्ते ध्वजारोहन करण्यात आले. यावेळी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी किरण गणेश कोवे यांची विशेष उपस्थिती होती.

ध्वजारोहणानंतर वंदे मातरम हे गीत, राष्ट्रगीत आणि महाराष्ट्र गीत गायले गेले. यावेळी तंबाखू मुक्तीची सामूहिक शपथ घेण्यात आली. नंतर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक अर्पित चौहान यांनी उपस्थित अधिकारी व कर्मचाऱ्यांना महाराष्ट्र दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

## डम्पिंग ग्राउंडच्या जागेवर ट्रान्सपोर्ट नगर उभारा !

### सरकार सैलानी ट्रक मालक - चालक असोसिएशनचे पालकमंत्र्यांना निवेदन

•सिटी न्युज ब्युरो @ वाशीम•

वाशिम शहरातील वाढत्या ट्रक वाहतुकीमुळे पार्किंग समस्या निर्माण झाली आहे. हे तोडगा कायमस्वरूपी काढण्यासाठी शहरातील डम्पिंग ग्राउंडच्या जागेवर ट्रक पार्कीगसाठी ट्रान्सपोर्ट नगर उभारण्याची मागणी करण्यात आली आहे. या संदर्भात सरकार सैलानी ट्रक मालक - चालक असोसिएशनच्या वतीने पालकमंत्री दत्तात्रय भरणे यांना निवेदन देण्यात आले आहे.



दिलेल्या निवेदनात नमूद आहे की, वाशीम जिल्हयाचे प्रमुख बाजारपेठ म्हणून ओळखला जात असल्याने येथे मोठ्या प्रमाणावर मालवाहू ट्रकची वर्दळ सुरू असते. मात्र शहरात नियोजित ट्रक पार्किंगची सुविधा नसल्याने दिघेवाडी चौक ते आंबेडकर चौक, बाकलीवाल शाळा परिसर, पुसद नाका, हिंगोली नाका, रिसोड नाका आदी ठिकाणी ट्रक उभे राहत आहेत. यामुळे वाहतूक कोंडीबरोबरच सुरक्षेचेही प्रश्न निर्माण होत असून उभ्या ट्रकमधून बॅटरी, डिझेल तसेच सोयाबीन, तूर, चणा यांसारख्या मालाची चोरी होण्याच्या घटना वाढत आहेत. दरम्यान, शहरालगत असलेल्या डंपिंग ग्राउंडमुळे परिसरातील नागरिकांना विषारी वायूचा त्रास सहन करावा लागत असून विविध आजारांचा धोका निर्माण झाला आहे. महाराष्ट्र घनकचरा व्यवस्थापन नियमांनुसार डंपिंग ग्राउंड हे शहरापासून किमान ०५ किलोमीटर अंतरावर असणे अपेक्षित आहे. त्यामुळे सद्यस्थितीत असलेला डंपिंग ग्राउंड हटवून त्या जागेवर ट्रान्सपोर्ट नगर उभारल्यास एकाच वेळी दोन समस्या मार्गी लागू शकतात. असे दिलेल्या निवेदनात म्हटले आहे. तरी पालकमंत्र्यांनी या विषयाकडे गांभीर्याने लक्ष देऊन ट्रक पार्किंगसाठी स्वतंत्र ट्रान्सपोर्ट नगर मंजूर करावे अशी मागणी निवेदनातुन करण्यात आली आहे. यावेळी नगरसेवक शेख नूर, असोसिएशनचे वाशीम जिल्हा अध्यक्ष सय्यद रहेबर, उपाध्यक्ष आरिफ़ खान, गोरु भाई, मो .शोएब उपस्थित होते.

## मेडशी येथील वन विभागाच्या डेपोला भीषण आग

•सिटी न्युज ब्युरो @ वाशीम•

मेडशी परिसरातील वन विभागाच्या डेपोमध्ये आज दुपारी तीनच्या सुमारास अचानक भीषण आग लागल्याने परिसरात एकच खळबळ उडाली होती. कारण ह्या ठिकाणी वनविभागाचे मौल्यवान आडजात तसेच सागवानाचे लाकूड खूप मोठ्या प्रमाणत व गावालगत ठेवले असल्यामुळे कमी वेळेत ह्या भिषण आगीवर नियंत्रण मिळवण्याचे मोठे आव्हाहन वन कर्मचाऱ्या पुढे होते. मात्र समय सूचकता ठेवत नियोजनबद्ध कार्यक्रम राबवत आगीवर नियंत्रण मिळवले. आगीची तीव्रता मोठी असल्यामुळे डेपोतील लाकूड साठा पेट घेत जळू लागला होता. घटनेची माहिती मिळताच वन कर्मचाऱ्यांनी तत्काळ अग्निशामन दलाला पाचारण केले. अग्निशामन दलाची गाडी



घटनास्थळी दाखल होताच वनकर्मचारी, पोलिस कर्मचारी, महसूल कर्मचारी, वनमजूर व स्थानिक नागरिक व आपदा मित्र अजिंक्य मेडशीकर मदतीने आगीवर नियंत्रण मिळवण्यासाठी शर्थीचे प्रयत्न करण्यात आले. अखेर वेळेत आग आटोक्यात आणण्यात यश आले. योग्य वेळी आग विझवण्यात आल्यामुळे लाखो रुपयांची संपत्ती वाचली असल्याचे प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही. दरम्यान, आगीचे नेमके कारण अद्याप अस्पष्ट असून वन विभागाकडून पुढील तपास सुरू आहे.

## कंपनीकडे थकीत असलेले ८१९ शेतकऱ्यांचे पैसे मिळणार !

•सिटी न्युज ब्युरो @ वाशीम•

किनखेडा शेत शिवारात शेतकऱ्यांच्या शेतातून गेलेल्या लाईनचा मोबदला मनसेच्या आंदोलनामुळे शेतकऱ्यांना मिळणार असून याचा लाभ ८१९ शेतकऱ्यांना मिळणार आहे. सदर पैसे हे कंपनीकडे २०२१ पासून थकीत होते.

या आंदोलनाचे नेतृत्व महाराष्ट्र नवनिर्माण शेतकरी सेनेचे तालुकाध्यक्ष रघुनाथ खुपसे यांनी मनसेचे मा. जिल्हाध्यक्ष मनिष डांगे यांच्या मार्गदर्शनाखाली केले. आंदोलनानंतर सदर कंपनीकडून दि. २६ तारखेला २० लाभार्थ्यांचे पैसे शेतकऱ्यांच्या खात्यात जमा केले आणि उर्वरीत २७४ लोकांचे पैसे ३० एप्रिल पर्यंत खात्यात जमा करुन उर्वरीत ४०० शेतकऱ्यांचे पैसे १५ जून पर्यंत देणार असल्याचे लेखी आश्वासन देण्यात आले. त्यामुळे आंदोलन मागे घेण्यात आले. यावेळी सरपंच सुनिल लांडकर, रवि वानखेडे मा.



शहराध्यक्ष मनसे, संदिप वानखेडे, फकीरा करडीले, जुम्मा मांजरे, शाहरुख मांजरे, यांच्यासह ज्ञानेश्वर लांडकर, विशाल भालेराव, दत्ता बुंधे, रघुनाथ खुपसे, आकाश इंगोले, पवन लांडकर, पदुम्न खांबलकर, दत्ता इंगोले, सुभाष खांबलकर, सुनिल लांडकर, रवि गायकवाड, नितेश खांबलकर, गजानन इंगोले, कैलास गायकवाड, सिध्दार्थ गायकवाड, कुंडलीक धाबे, नामदेव गायकवाड, सचिन लांडकर, नारायण खुपशे, सुधाकर इंगोले, विश?वास भिसडे यांच्यासह समस्त गावकरी सुध्दा सहभागी झाले होते. यावेळी पोलिस निरिक्षक हिवरकर, बिट जमदार विनोद दामोदर, रवि जवंजाळ, गोपाल कव्हर, विष्णू इढोळे, संजय देवळे आदींचा बंदोबस्त होता.

## तोंडगाव येथे गुणवंत शिक्षक व विद्यार्थ्यांचा सत्कार

•सिटी न्युज ब्युरो @ वाशीम•

येथून जवळच असलेल्या तोंडगाव येथे राष्ट्रीय पंचायत राज दिनाचे औचित्य साधून शुक्रवार २४ एप्रिल रोजी तोंडगाव ग्रामपंचायत प्रशासनाचे वतीने गुणवंत शिक्षक आणि गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पंचायत समितीचे माजी सभापती डॉ. भगवानराव गोटे होते. तर प्रमुख अतिथी म्हणून वाशीमचे जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर, प्राथमिक शिक्षणाधिकारी संजय ससाणे, तोंडगावच्या सरपंच सौ. वंदना भगवान गोटे, बाजार समितीचे संचालक दत्तराव गोटे, समाजसेवक रामहरी मल्हारी गोटे, दाजिबा पाटील, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष गणेश शांतीराम गोटे, समाजसेवक दगडू पाटील, आश्रुजी पाटील, माजी





केंद्रप्रमुख विलास गोटे, शेषराव गोटे, गोपाल दत्ता गोटे, राजु कोंघे यांचे सह आदी मान्यवर उपस्थित होते. वाशीम तालुक्यात ज्ञानदानाचे प्रामाणिक कार्य करून ग्रामिण भागातील शालेय शिक्षणाचा दर्जा उंचावून गोर गरीब विद्यार्थ्यांना नवोदय विद्यालयाच्या प्रवेश प्रक्रियेत आणि शिष्यवृत्ती परीक्षेत चांगल्या गुणांनी उत्तीर्ण करण्यासाठी तन, मन, धनाने प्रगती पथावर नेणारे गुणवंत शिक्षक मिनाताई मापारी, विनोद झनक, संतोष इढोळे, संदिप पाठक, तोंडगाव येथील जि.प. प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक सुभाष गोटे या गुणवंत शिक्षकांचा उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाचे जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर, प्राथमिक शिक्षणाधिकारी संजय ससाणे, सत्कारमूर्ती शिक्षक संतोष इढोळे, विनायक भगवान गोटे यांनी आपल्या मनोगतातून गुणवंत विद्यार्थी व गुणवंत शिक्षकांना मेहनत करून आणि जिद्दीने अभ्यास करून उच्च शिक्षीत होवून उच्च पदस्थ अधिकारी व्हावे असे सांगितले. या कार्यक्रमास तोंडगावचे उपसरपंच सिद्धार्थ ढोले, ग्रामविकास अधिकारी ज्ञानेश्वर भांडारकर, किरणताई पाटोळे, विलास रामहरी गोटे, सुनिता वैरागडे, शिक्षक गोपाल काळे, प्रशांत इढोळे, दिपक रामहरी गोटे, प्रविण रामचंद्र गोटे, पांडुरंग वसंता गोटे, दिलीप काळे, गणेश तुकाराम गोटे, विवेक गजानन गोटे, संजय वाकुडकर, किसनराव कड, प्रकाश चव्हाळे, पांडुरंग चव्हाळे विनोद हजंबे, बबलु शिंगरूप, विष्णुपंत सुरेकर, शंकर वाकुडकर, वैभव वाकुडकर, मधुकर मानदार, भारत शिवाजी गोटे यांचेसह तोंडगाव व परिसरातील नागरिक उपस्थित होते. या कार्यक्रमाचे संचालन शंकर भारती यांनी केले. प्रास्ताविक मुख्याध्यापक सुभाष निंबाजी गोटे यांनी केले तर आभार गजानन पाटोळे यांनी मानले.

## कामात लागेना मन, शासन देईना मानधन !

### वाशीम जिल्हा ग्रामरोजगार सहाय्यकांचे लाक्षणिक उपोषण

•सिटी न्युज ब्युरो @ वाशीम•

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत कार्यरत वाशिम जिल्ह्यातील ग्रामरोजगार सहाय्यकांनी आपल्या विविध प्रलंबित मागण्यांसाठी १ मे (महाराष्ट्र दिन व कामगार दिन) रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर एक दिवसीय लाक्षणिक उपोषण सुरू केले आहे.

ग्रामरोजगार सहाय्यकांचे ३० मार्च २०२६ पासून कामबंद आंदोलन सुरू असून, शासनाकडून समाधानकारक प्रतिसाद न मिळाल्याने त्यांनी उपोषणाचा मार्ग स्वीकारला आहे. २ मे २०११ च्या शासन निर्णयानुसार हे पद अर्धवेळ स्वरूपाचे असताना, २५ मार्च २०२६ पासून नाममात्र व्यवस्थापन प्रणालीद्वारे चेहरा ओळख प्रणालीसह दिवसातून दोन वेळा ऑनलाईन हजेरी बंधनकारक करण्यात आली आहे. त्यामुळे प्रत्यक्षात पूर्णवेळ काम करूनही मानधन मात्र अर्धवेळाचे मिळत असल्याची तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. ग्रामपंचायत स्तरावर घरकुल (८० ते ९०), फळबाग (१० ते १५), सिंचन विहिरी (२० ते २५), गोठे, जलतारा आदी अनेक कामांचा प्रचंड ताण असल्याने दिवसातून दोन वेळा प्रत्यक्ष ठिकाणी जाऊन हजेरी देणे व्यवहार्य नसल्याचे सहाय्यकांचे म्हणणे आहे. ३ ऑक्टोबर २०२४ च्या शासन निर्णयाची तात्काळ अंमलबजावणी करावी सुमारे १९ महिन्यांचे थकीत मानधन व भत्ते तात्काळ




खात्यावर जमा करावेत अर्धवेळ पदाला पूर्णवेळ दर्जा द्यावा. नाममात्र व्यवस्थापन प्रणालीतील ऑनलाईन हजेरीतील तांत्रिक अडचणी दूर कराव्यात ग्रामरोजगार सहाय्यकांना विमा सुरक्षा लागू करावी सदर शासन निर्णयानुसार दरमहा ८,००० रुपये मानधन व २,००० रुपये भत्ता जाहीर झाला असला, तरी गेल्या १८ ते १९ महिन्यांपासून प्रत्यक्षात एक रुपयाही मिळालेला नसल्याचा आरोप संघटनेने केला आहे.

या मागण्यांसाठी ग्रामरोजगार सहाय्यकांनी यापूर्वी जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी (जिल्हा परिषद), पोलीस अधीक्षक व नगरपरिषद मुख्याधिकारी यांना निवेदने सादर केली होती. मात्र कोणताही ठोस निर्णय न झाल्याने आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशारा पदाधिकाऱ्यांनी दिला आहे. ग्रामस्तरावर शेतकरी व शासन यांच्यातील दुवा म्हणून काम करणाऱ्या ग्रामरोजगार सहाय्यकांकडून मोठ्या प्रमाणावर काम करून घेतले जात असताना, त्यांच्या मूलभूत मागण्यांकडे दुर्लक्ष होत असल्याने असंतोष वाढत आहे.

**उपोषणस्थळावरुन तालुका अध्यक्ष कावरे यांच्या वडिलाला भावपूर्ण श्रद्धांजली**

उपोषणस्थळी ग्रामरोजगार सहाय्यक संघटनेचे कारंजा तालुकाध्यक्ष देवेंद्र कावरे यांच्या वडिलांचे नुकतेच निधन झाल्याने त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. यावेळी उपस्थितांनी दोन मिनिटे मौन पाळून आदरांजली वाहिली.

**लोकप्रतिनिधींनाही दिले निवेदन**

वाशिम जिल्हा ग्रामरोजगार सहाय्यक संघटनेच्या वतीने आपल्या प्रलंबित मागण्यांसंदर्भात स्थानिक आमदार, खासदार तसेच पालकमंत्री यांना निवेदन सादर करण्यात आले आहे. या निवेदनाद्वारे शासन स्तरावर तात्काळ हस्तक्षेप करून थकीत मानधन, भत्ते व इतर मागण्यांवर त्वरित निर्णय घ्यावा, अशी मागणी करण्यात आली आहे.

**प्रमुख मागण्या**

३ ऑक्टोबर २०२४ च्या शासन निर्णयाची तात्काळ अंमलबजावणी करावी सुमारे १९ महिन्यांचे थकीत मानधन व भत्ते तात्काळ खात्यावर जमा करावेत अर्धवेळ पदाला पूर्णवेळ दर्जा द्यावा. नाममात्र व्यवस्थापन प्रणालीतील ऑनलाईन हजेरीतील तांत्रिक अडचणी दूर कराव्यात ग्रामरोजगार सहाय्यकांना विमा सुरक्षा लागू करावी

सिटी न्यूज सुपरफास्ट बुलडाणा
रविवार, दि. ३ मे २०२६
http://epaper.citynewssuperfast.com

# समृध्दी महामार्गावर धावती ट्रॅव्हल्स जळून खाक 35 प्रवासी थोडक्यात बचावले, चालक फरार

प्रतिनिधी ३ मे

**मेहकर :** समृद्धी महामार्गावर अपघातांची मालिका थांबण्याचे नाव घेत नसून शनिवारी सायंकाळच्या सुमारास पुण्याहून पुसदकडे जाणाऱ्या एका खाजगी ट्रॅव्हल्सने अचानक पेट घेतल्याची खळबळजनक घटना घडली. सुदैवाने, या आगीतून ट्रॅव्हल्समधील ३५ प्रवासी थोडक्यात बचावले असून, एका प्रवाशाला किरकोळ दुखापत झाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, ट्रॅव्हल्स क्रमांक एम. एच. ३८ एफ ३८९९ ही पुण्यावरून पुसदकडे जात होती. शनिवारी २ मे सायंकाळी ५:२० वाजेच्या सुमारास मेहकर जवळ नागपूर कॉरिडॉरवरील चॅनल क्रमांक २९५.७०० जवळ ही गाडी आली असता, गाडीच्या मागील बाजूने अचानक धूर निघू लागला. मागून येणाऱ्या वाहनचालकांनी ही बाब ट्रॅव्हल्स चालकाच्या लक्षात आणून दिली. चालकाने तत्काळ गाडी महामार्गाच्या कडेला उभी केली. गाडीने पेट घेताच प्रवाशांमध्ये मोठी धावपळ उडाली. गाडीत एकूण ३५ प्रवासी होते. सर्वप्रवासी सुखरूप खाली उतरले, मात्र खाली उतरत असताना बबन कदम (वय ४८, रा. पुसद यांच्या खांद्याला किरकोळ दुखापत झाली. त्यांना तातडीने रुग्णवाहिकेद्वारे मेहकर ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

विशेष म्हणजे, घटनेनंतर चालक आकाश जमदाडे रा. पुसद हा घटनास्थळावरून फरार झाला आहे. घटनेची माहिती मिळताच नियंत्रण कक्ष छत्रपती संभाजी नगर आणि महामार्ग पोलीस उपकेंद्र फर्दापूरचे पोलीस उपनिरीक्षक जितेंद्र राऊत हवालदार क्र. ९९८, पोलीस कॉन्स्टेबल १५५९, २७३१, २६११ व एम. एस. एफ. चे जवान तातडीने घटनास्थळी पोहोचले. सर्व प्रवाशांना शासकीय वाहनाने सुरक्षितपणे मेहकर बस स्थानकावर पोहोचवण्यात आले. महामार्गावर बॅरिकेटिंग करून वाहतूक सुरळीत करण्यात आली. गाडी पूर्णपणे जळून खाक झाली असून, सध्या महामार्गावरील परिस्थिती शांत व नियंत्रणात आहे. पोलीस प्रशासनाने दिलेल्या वेळेनुसार, ५:३० वाजता माहिती मिळताच ५:४५ पर्यंत पोलीस पथक घटनास्थळी दाखल झाले होते आणि सायंकाळी ७ वाजेपर्यंत मदतकार्य पूर्ण करण्यात आले.

# अंजुमन ज्युनियर कॉलेज, खामगाव चा इयत्ता १ २वी परीक्षे चा निकाल १ ० ० टक्के

प्रतिनिधी ३ मे

**खामगाव:** २ मे २०२६ रोजी, महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक परीक्षा मंडळाने इयत्ता १२वीचा निकाल जाहीर केला, ज्यामध्ये अंजुमन ज्युनियर कॉलेज, खामगाव चा निकाल १००३ लागला . अंजुमन मुफिदुल इस्लाम संस्था, खामगावद्वारे संचालित अंजुमन ज्युनियर कॉलेजमध्ये इयत्ता १२वी विज्ञान शाखेसाठी नोंदणी केलेल्या ११५ विद्यार्थ्यांनी ११४ विद्यार्थ्यांनी इयत्ता १२वीची परीक्षा दिली आणि सर्व ११४ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. निकाल १००३ लागला. ज्यामध्ये ०४विद्यार्थ्यांनी डिस्टिंक्शन ग्रेट (विशेष प्रावीण्य), ४३ विद्यार्थ्यांनी प्रथम श्रेणी, ६५ विद्यार्थ्यांनी द्वितीय श्रेणी आणि दो विद्यार्थी तृतीय श्रेणी उत्तीर्ण झाले यामुळे निकाल १००३लागला .

आणि कला शाखेतील ४७ विद्यार्थी परीक्षेत सहभागी आणि सर्व ४७ विद्यार्थी उत्तीर्ण झाले व इयत्ता निकाल १००३ लागला यामध्ये ०१ विद्यार्थी डिस्ट्रीब्यूशन ग्रेट मध्ये , ०९ विद्यार्थी प्रथम श्रेणीत, २८ विद्यार्थी द्वितीय श्रेणीत आणि ०९ विद्यार्थी तृतीय श्रेणी उत्तीर्ण झाले. अंजुमन मुफिदुल इस्लामचे अध्यक्ष डॉ. वकार-उल-हक खान , ताजुद्दीन हमदुले ,व तुफैल अहमद यांनी प्राचार्य अहफाज-उल-हक खान, उपप्राचार्य उमैर मोहम्मद खान, पर्यवेक्षक शकील अहमद , प्राध्यापक आणि उत्तीर्ण झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

# पिंपळगाव उंडा येथे हार्वेस्टर चालकाचा खून

प्रतिनिधी ३ मे

**साखरखेर्डा :** पोलीस स्टेशन अंतर्गत लव्हाळा ते मेहकर रोडवरील पिंपळगाव उंडा गावाजवळील एका शेतात हार्वेस्टर चालकाचा खून झाल्याची माहिती साखरखेर्डा पोलिसांना मिळताच त्यांनी तातडीने तपासाची चक्रे फिरवली आणि अवघ्या काही तासांतच आरोपीस अटक केली. उपरोक्त घटना २९ एप्रिल रोजी रात्री घडली. मृतक व्यक्तिचे नाव करमजीतसिंग जनमजीतसिंग पंजाब) असे आहे.

साखरखेर्डा, लव्हाळा, हिवरा आश्रम परिसरात पेनटाकळी आणि कोराडी हे दोन मोठी धरणे असून ओलिताची सोय आहे. हजारों हेक्टर क्षेत्रावर मका, गहू, हरभरा ही पिके घेतली जातात. मजूर वर्गाअभावी अनेक शेतकरी आपल्या पिकांची काढणी हार्वेस्टिंग व्दारे करतात. पंजाब हरियाणा राज्यातील अनेक हार्वेस्टर मालक महाराष्ट्रात येऊन पिकांची काढणी हार्वेस्टिंगच्या साह्याने करतात. पंजाब राज्यातील शाकिरपूरखान येथील करमजीतसिंग जनमजीतसिंग वय ५५ वर्ष हे सात मजूर सोबत घेऊन या भागात आले होते. पिंपळगाव उंडा येथे

एका ढाब्याजवळ त्यांचा मुक्काम असायचा. २९ एप्रिल रोजी रात्री करमजीतसिंग आणि बबलूसिंग करणसिंग यांच्यात वाद झाला होता. त्या वादात करमजीतसिंग यांनी आई, बहिणीवरून शिवीगाळ केली. तो राग मनात धरून रात्री आठ ते नऊ वाजताच्या सुमारास बबलूसिंग करणसिंग याने लोखंडी रॉडने डोक्यात वार केले. त्यातच करमजीतसिंग यांचा तडफडून मृत्यू झाला. उपरोक्त घटना कोणालाही कळू नये म्हणून खाटेवर झोपवून ठेवल्यागत मृतदेह ठेवला. आणि बाकी कामगार दूर झोपले ३० एप्रिल रोजी सकाळी शिवाजी काळे हे मॉर्निंग वाकला जात अस असताना त्यांना संशय आला. जवळ जाऊन पाहिले असता करणजीतसिंग हा

अवस्थेत आढळून आला. लागलीच त्यांनी साखरखेडा पोलीस स्टेशनचे ठाणेदार गजानन करेवाड यांना घटनेची माहिती दिली. ठाणेदार गजानन करेवाड यांनी पंचनामा करून मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी मेहकर येथे पाठविला. अप्पर पोलीस अधीक्षक निलेश गायकवाड उपविभागीय पोलिस अधिकारी संतोष खाडे यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील तपास करीत असताना सात संशयित व्यक्तिंना ताब्यात घेतले. त्यातील अमित कुमार यांनी सत्य परिस्थिती कथन केली. आरोपी बबलुसिंग करणसिंग यास पोलिस हिसका दाखवला असता त्याने गुन्ह्याची कबुली दिली. यासाठी दुय्यम ठाणेदार संदीप मेघने, पोलीस हेड कॉन्स्टेबल लक्ष्मण इनामे, निलेश मोरे, आणि फॉरेन्सिक टीमचे सहकार्य लाभले.

# खामगाव तालुक्याचा 94.89 टक्के निकाल ; यंदा कामगिरीत सुधारणा !

प्रतिनिधी ३ मे

♦ यंदाही मुलींनीच मारली बाजी: मुलांपेक्षा ४.११ टक्क्यांनी सरस कामगिरी!

**खामगाव :** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे फेब्रुवारी २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (बारावी) परीक्षेचा निकाल जाहीर झाला आहे. या परीक्षेत खामगाव तालुक्याचा एकूण निकाल ९४.८९ टक्के लागला असून, गतवर्षीच्या तुलनेत यंदाच्या कामगिरीत सुधारणा झाल्याचे दिसून येत आहे.

यंदाच्या निकालात मुलींचे यश ९६.९७टक्के राहिले असून, ते मुलांच्या तुलनेत (९२.८६ टक्के) ४.११ टक्क्यांनी अधिक आहे. पुनर्परीक्षार्थी श्रेणीत तालुक्याचा निकाल ६४.९३ टक्के लागला आहे. या श्रेणीत २३१ विद्यार्थी परीक्षेला बसले होते, त्यापैकी १५० विद्यार्थी उत्तीर्ण झाले. या गटातही मुलींनी ७०.६५ टक्के निकाल नोंदवत मुलांपेक्षा (६१.१५ टक्के) सरस कामगिरी केली आहे. तालुक्यातील बहुतांश शाळांचा निकाल हा शंभर टक्के लागला आहे.

**शाळानिहाय निकाल**

अंजुमन उच्च माध्यमिक शाळा खामगाव ९९.३८ टक्के, केला हिंदी उच्च माध्यमिक शाळा खामगाव ६१.९० टक्के, जी. एस. कनिष्ठ कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय खामगाव ९१.९० टक्के, जिल्हा परिषद कनिष्ठ महाविद्यालय मुले खामगाव ८८.०५ टक्के, श्री अर्जन खिमजी नॅशनल ज्युनियर कॉलेज खामगाव ९१.०८ टक्के, जिल्हा परिषद कनिष्ठ महाविद्यालय (मराठी) बोथाकाझी ९६ टक्के, जिल्हा परिषद मुलींचे कनिष्ठ महाविद्यालय खामगाव ९३.९३ टक्के, श्री. जे. व्ही. मेहता नवयुग कनिष्ठ महाविद्यालय खामगाव ९५.८३ टक्के, महात्मा फुले कला उच्च माध्यमिक विद्यालय पळशी (बु.) १०० टक्के, जिल्हा परिषद उच्च माध्यमिक विद्यालय पिंपळगाव राजा २०.७४ टक्के, महात्मा ज्योतिबा फुले ज्युनियर कॉलेज लाखनवाडा ९७.९१ टक्के, एस. एम. स्व. बी. शिंगणे कला विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय खामगाव ८७.५० टक्के, महात्मा फुले कला कनिष्ठ महाविद्यालय मांडका ८१.५२ टक्के.

# अनया गवळीला शंभर टक्के गुण

प्रतिनिधी ३ मे

**खामगाव :** येथील मातोश्री जयाबेन जिवनलाल मेहता सरस्वती विद्या मंदिर मधील विद्यार्थीनी कु. अनया अनुप गवळी हीने इयत्ता तृतीय वर्गाच्या इंग्रजी माध्यमात उत्कृष्ट यश संपादन केले असून तिला १००३टक्के गुण मिळाले आहे. संपूर्ण क्लास मधून तीने उत्कृष्ट गुण मिळवून प्रथम क्रमांकावर आली आहे.



इंग्रजी माध्यमाच्या सर्वच विषयांमध्ये तिने ए ग्रेड प्राप्त केले आहे. त्यामुळे तिचे सर्वत्र कौतुक होत आहे. तीच्या यशाचे श्रेय ती तिचे आई, वडील आणि ट्युशन टीचर तोडेकर मॅडम आणि शाळेतील शिक्षकवृदांना देते.

# आरटीईत पसंतीच्या शाळेसाठी थांबाल, तर नंबर गमावून बसाल !

♦ पसंतीच्या शाळेच्या प्रतीक्षेत राहिल्यास प्रवेशाची संधी हुकण्याची शक्यता: शिक्षण विभागाचा इशारा

प्रतिनिधी ३ मे

**खामगाव :** शिक्षण हक्क कायद्यानुसार (आरटीई) २५ टक्के राखीव जागांसाठी यंदाच्या प्रवेश प्रक्रियेला वेग आला असला, तरी अनेक पालक अद्याप पसंतीच्या शाळेच्या प्रतीक्षेत असल्याचे चित्र दिसत आहे. ६ एप्रिल रोजी ऑनलाइन लॉटरी काढल्यानंतर १० एप्रिलला निवड यादी जाहीर करण्यात आली. दरम्यान, प्रवेशासाठी ८ मेपर्यंत मुदतवाढ देण्यात आली असली, तरी प्रतीक्षा करत बसल्यास मिळालेला क्रमांक गमावण्याचा धोका असल्याचा इशारा शिक्षण विभागाने दिला आहे.

जिल्ह्यात आरटीईअंतर्गत आतापर्यंत २,२२० विद्यार्थ्यांचे प्रवेश निश्चित झाले आहेत; मात्र अजूनही मोठ्या संख्येने पालक पसंतीच्या शाळेच्या प्रतीक्षेत असल्याने प्रवेश प्रक्रिया अपेक्षित गतीने पूर्ण होत नसल्याचे दिसून येत आहे. परिणामी, अनेक जागा रिक्त राहण्याची शक्यता व्यक्त होत आहे. शिक्षण विभागाने स्पष्ट केले आहे की, लॉटरीत नाव आलेल्या पालकांनी वेळ न दवडता तत्काळ प्रवेश प्रक्रिया पूर्ण करावी. अंतिम यादीची वाट पाहत राहिल्यास किंवा एसएमएसची प्रतीक्षा केल्यास संधी हुकू शकते. त्यामुळे पालकांनी सक्रिय भूमिका घेऊन दिलेल्या मुदतीत आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

**२२६ शाळांत २,९३३ जागा राखीव**

जिल्ह्यातील २२६ मान्यताप्राप्त खासगी शाळांमध्ये आरटीईअंतर्गत २५ टक्के कोट्यातून एकूण २,९३३ जागा राखीव ठेवण्यात आल्या आहेत. या जागांवर आर्थिकदृष्ट्या दुर्बल व वंचित घटकांतील विद्यार्थ्यांना मोफत शिक्षणाची संधी उपलब्ध करून दिली जाते.

# मुंबई–नागपूर, पुणे–नागपूर वीकएंड स्पेशल गाड्या जाहीर ; मलकापुरात थांबा !

प्रतिनिधी ३ मे

♦ उन्हाळी गर्दीच्या पार्श्वभूमीवर मध्य रेल्वेचा निर्णय

**मलकापूर :** प्रवाशांसाठी मध्य रेल्वेकडून दिलासादायक निर्णय घेण्यात आला आहे. उन्हाळी सुट्टया आणि वाढती प्रवासी गर्दी लक्षात घेऊन मुंबई-नागपूर तसेच पुणे-नागपूर मार्गावर एकूण सहा तीकएंड विशेष गाड्या चालवण्याची घोषणा करण्यात आली आहे. या गाड्यांना मलकापूर येथे थांबा देण्यात आल्याने जिल्ह्यातील प्रवाशांची मोठी सोय होणार आहे. मलकापूर जिल्हा प्रवासी सेवा संघाचे अध्यक्ष महेंद्रकुमार बुरड तसेच तालुका प्रवासी मंडळाचे अध्यक्ष पारसमल झाबक यांनी ही माहिती दिली. या निर्णयामुळे मुंबई, पुणे व नागपूरदरम्यान अतिरिक्त रेल्वे सुविधा उपलब्ध होऊन प्रवास अधिक सुलभ होणार आहे.ट्रेन क्रमांक ०१०२१ (सीएसएमटी-नागपूर) ही गाडी १ मे व३ मे २०२६ रोजी रात्री १२.३० वाजता सुटून त्याच दिवशी दुपारी ३.४५ वाजता नागपूर येथे पोहोचेल. तर ट्रेन क्रमांक ०१०२२ (नागपूर-सीएसएमटी) ही गाडी १ व ३ मे रोजी रात्री ९.४० वाजता सुटून दुसऱ्या दिवशी दुपारी १.५० वाजता मुंबईत पोहोचेल. या गाड्यांचे प्रमुख थांबे दादर, ठाणे, कल्याण, नाशिक रोड, मनमाड, जळगाव, भुसावळ, मलकापूर, शेगाव, अकोला, बडनेरा व वर्धा हे आहेत. ट्रेन क्रमांक ०१४६७ (पुणे-नागपूर) ही गाडी १ मे रोजी दुपारी ३.५० वाजता सुटून दुसऱ्या दिवशी सकाळी ८.०५ वाजता नागपूरला पोहोचेल. तर ट्रेन क्रमांक ०१४६८ (नागपूर-पुणे) ही गाडी ३ मे रोजी सकाळी ७ वाजता सुटून त्याच दिवशी रात्री ११.३० वाजता पुण्यात दाखल होईल. या मार्गावर दौंड, अहमदनगर, मनमाड, जळगाव, भुसावळ, मलकापूर, शेगाव, अकोला, बडनेरा व वर्धा हे प्रमुख थांबे राहतील.

**२९ एप्रिलपासून आरक्षण सुरू**

या विशेष गाड्यांसाठी आरक्षण २९ एप्रिल २०२६ पासून सर्व संगणकीकृत आरक्षण केंद्रांवर तसेच आयआरसीटीसीच्या संकेतस्थळावर सुरू करण्यात आले आहे. वाढत्या प्रवासी संख्येचा विचार करून ही अतिरिक्त सुविधा देण्यात आली असून, विदर्भासह बुलढाणा जिल्ह्यातील प्रवाशांना याचा मोठा फायदा होणार आहे.

# भारतीय बौध्द महासभेच्या वतीने भगवान गौतम बुध्द जयंती साजरी

प्रतिनिधी ३ मे

**खामगाव :** भारतीय बौद्ध महासभा शहर शाखेच्या वतीने भगवान गौतम बुद्ध जयंती साजरी करण्यात आली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक पुतळा येथे सकाळी साडेनऊ वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करण्यात आला व बुद्ध वंदना घेण्यात आली. आणि समाजातील मान्यवरांच्या उपस्थितीत बुद्ध जयंती साजरी करण्यात आली. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे एस. एस. वले जिल्हाध्यक्ष भारतीय बौद्ध महासभा व एम ओ सरकटे जिल्हा सरचिटणीस व के के शेगोकार जिल्हा उपाध्यक्ष यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे अध्यक्ष दादासाहेब हेलोडे शहराध्यक्ष भारतीय बौद्ध महासभा तसेच विशाखाताई सावंग जिल्हाध्यक्ष वंचित बहुजन आघाडी महिला विभाग सुमनताई थाटे, उपाध्यक्ष व ब आघाडी डी एस वानखडे, प्रशांत जमदाडे जिल्हा संघटक भारतीय बौद्ध महासभा रामदास गवई, भास्कर गवई, दादाराव मोरे, अरुण सावंग, साहित्यिक धरमपाल ससाने, प्रवीण पहुरकर, साहित्यिक अविनाश वाकोडे, बी डी धुरंदर, कार्याध्यक्ष राज्य कार्यध्यक्ष्य. कष्ट्रइब संघटना शालिग्राम हेलोडे सैनिक जनार्दन इंगळे, सैनिक मोतीराम इंगळे, सैनिक विलास इंगळे, अशोक इंगळे, जेडी झिने, दीपक वानखडे, जीआर मुळे, माजी पीएसआय अरविंद आसोडे, महादेव मोरे इत्यादी मान्यवर उपस्थित होते. सूत्रसंचालन कार्यक्रमाचे विशाल हिवराळे, तालुका सरचिटणीस व आभार प्रदर्शन दादासाहेब हेलोडे शहराध्यक्ष भारतीय बौद्ध महासभा खामगाव जिल्हा बुलढाणा सिद्धार्थ शेजव यांनी शरणेतय गाथा घेऊन कार्यक्रमाची सांगता झाली.

# हडम मशिनमध्ये अडकून शेतमजुराचा मृत्यू

प्रतिनिधी ३ मे

**खामगाव :** जळगाव तालुक्यातील धानोरा दाऊपुर शिवारात एक मे रोजी हृदय द्रावक घटना घडली आहे हडम मशीनवर काम करत असताना गळ्यातील रुमाल मशीनमध्ये अडकल्यामुळे एका २७ वर्षीय तरुणाचा मशीनमध्ये अडकून मृत्यू झाला. या अपघातात शेतमजूर तरुणाचे डोके व हात शरीरापासून वेगळे झाले असूनया घटनेने परिसरात मोठी खळबळ उडाली आहे. मिळालेल्या माहितीनुसार पूनम उर्फ दुर्गेश पटेल वय वर्ष २७ राहणार खंडवा मध्य प्रदेश हा तरुण धानोरा शिवारात हडम मशीनवर काम करत असताना शुक्रवार १ मे रोजी सकाळी ८ च्या सुमारास हडम मशीनवर काम करत असताना अचानक त्याच्या गळ्यातील रुमाल कटर मशीनमध्ये अडकला रुमाल मशीनमध्ये ओढल्या गेल्याने काही कळण्याच्या आतच तो मशीनच्या दिशेने खेचला गेला. या भीषण अपघातात दुर्गेशचे डोके आणि हात कटरमध्ये आल्याने ते शरीरापासून पूर्ण वेगळे झाले. उर्वरित भाग खाली कोसळला आणि त्याचा जागीच मृत्यू झाला. या घटनेबाबत रमेश बुधा सोलंकी राहणार जम्मू पाणी जिल्हा बुऱ्हानपूर याने जळगाव जामोद पोलीस स्टेशनला माहिती दिली. त्यावरुन पोलिसांनी कलम १९४ँऱ्एए नुसार मर्ग दाखल केला आहे.

# पाणी प्रश्नावर जिल्हा नियोजन बैठकीत चर्चा

♦ मलकापूरचे नगराध्यक्ष जवारीवाले यांनी वेधले लक्ष

प्रतिनिधी ३ मे

**मलकापूर :** हतनूर धरणाच्या बँक वॉटरमधून मुबलक जलसाठा उपलब्ध असतानाही मलकापूर शहरात दहाव्या आणि बाराव्या दिवशी पाणीपुरवठा केला जात असल्याने नागरिकांना पाणीटंचाईचा सामना करावा लागत आहे. यामुळे जनजीवन विस्कळीत होत असल्याची व्यथा नगराध्यक्षांनी जिल्हा नियोजन बैठकीत मांडली.

दि. ३० एप्रिल रोजी पालकमंत्री मकरंद पाटील यांच्या उपस्थितीत जिल्हा नियोजन बैठक पार पडली. या बैठकीत नगराध्यक्ष अतिक जवारीवाले यांनी शहरातील पाणीपुरवठा व्यवस्थेवर सविस्तर लक्ष वेधले. त्यांनी सांगितले की, श्री क्षेत्र धुपेश्वर येथे पूर्णा नदीपात्रात असलेल्या हतनूर धरणाच्या बैंक वॉटरमधून पाणी उचलले जात असतानाही पुरवठा नियमित होत नाही. तसेच मलकापूर शहराचा केंद्र शासनाच्या अमृत योजनेत समावेश झालेला नाही, तर नगरोत्थान योजनेतील प्रस्ताव प्रलंबित असल्याचेही त्यांनी निदर्शनास आणले.शहरात पिण्याच्या पाण्याचा पुरवठा सध्या १० ते १२ दिवसांच्या अंतराने केला जात असल्याने नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. वाढत्या लोकसंख्येमुळे उपलब्ध पाणीपुरवठा अपुरा पडत असल्याचे चित्र आहे.भारनियमनामुळे पाणीपुरवठ्यावर परिणाम वाढती लोकसंख्या, नवीन विकासकामांसाठी निधीची कमतरता आणि जॅकवेल व जलशुद्धीकरण केंद्रावरील भारनियमनामुळे पाणीपुरवठा यंत्रणेवर परिणाम होत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. जनहिताच्या दृष्टीने पक्षभेद न करता उपाययोजना करण्याची मागणीही त्यांनी केली.

**जिल्हाधिकाऱ्यांकडून कार्यवाहीचे निर्देश**

या चर्चेवर प्रशासनाने सकारात्मक प्रतिसाद दिला असून पालकमंत्री मकरंद पाटील आणि जिल्हाधिकारी डॉ. प्रवीण देवरे यांनी संबंधित यंत्रणेला आवश्यक कार्यवाहीचे निर्देश दिले आहेत. तसेच विविध प्रस्ताव सादर करण्याबाबतही सूचना करण्यात आल्या असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे.

# ग्रा.पं. मधील गैरव्यवहाराच्या चौकशीचे लेखी पत्र दिल्यामुळे उपोषण मागे



प्रतिनिधी ३ मे

**खामगाव :** येथील ग्रा.प. मध्ये झालेल्या गैरव्यवहाराची चौकशी करून दोषींवर कारवाई करण्यात यावी या मागणीसाठी दि. २७ एप्रिल पासून स्थानिक ग्रा.प. कार्यालयासमोर शेषराव शामराव भोजणे यांनी आमरण उपोषण सुरू केले होते. मात्र उपोषण कर्त्यांना त्यांच्या मागण्या संदर्भात शेगाव पं. स.ने लेखी पत्र दिल्यामुळे आमरण उपोषण मागे घेण्यात आले. २९ एप्रिल रोजी सकाळी शेगाव पं.स.चे गटविकास अधिकारी यांच्या आदेशाने उपोषण कर्त यांच्या तक्रारीच्या अनुषंगाने उपोषण मंडपाला भेट देऊन शेगाव प. स. चे विस्तार अधिकारी एस एन पातोंडे, पी एस राजपूत, एस एस इंगोले, ग्रा. प अधिकारी वैशाली राठोड यांनी उपोषणकर्त्याच्या मागण्या संदर्भात चर्चा केली. चर्चेअंती दि. २० मे २०२६ पर्यंत चौकशी करून अहवाल देण्यात येईल असे लेखी पत्र दिल्यामुळे उपोषण कर्त भोजणे यांनी आपले आमरण उपोषण मागे घेतले.

# धीरेंद्र शास्त्री याचेवर गुन्हा दाखल करून राज्यात बंदी घाला

प्रतिनिधी ३ मे

♦ भाराकाँचे उपविभागीय अधिकाऱ्यांना निवेदन

**जळगाव जामोद :** धीरेंद्र शास्त्री उर्फ बागेश्वरबाबा याने इतिहासाची तोडमोड करून महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराजांच्या बाबत अनादर करण्याच्या हेतूने संताप जनक वक्तव्य केले व समस्त शिवप्रेमींच्या भावना दुखावल्या. धीरेंद्र शास्त्रीवर गुन्हे दाखल करून त्याचेवर महाराष्ट्रात बंदी घालण्यात यावी, अशी मागणी जळगाव जामोद भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या वतीने उपविभागीय अधिकारी यांना लेखी तक्रार वजा निवेदन देऊन केली आहे.

निवेदनात नमूद केले आहे की, छत्रपती शिवाजी महाराज यांनी आपण आता थकलो असल्याने पुढील कारभार रामदास स्वामी यांचे स्वाधीन केला असल्याचे जाणून बुजून कोणताही ऐतिहासिक पुरावा व तथ्य नसलेले शिवछत्रपतींचा अपमान करणारे संतापजनक विधान एका कार्यक्रमात करून महाराष्ट्र व देशभरातील सर्व शिवप्रेमींच्या भावना दुखावल्या. शिवछत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनात कधीही नसणारे रामदास स्वामी श्रोत्यांवर यांचे अस्तित्व बिंबवण्याचा प्रयत्न करून जाणून बुजून शिवप्रेमींचे दैवत असणाऱ्या छत्रपती शिवाजी महाराजांचा अपमान केला आणि विशेष याच कार्यक्रमात व्यासपीठावर राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, आरएसएसचे प्रमुख मोहन भागवत हे सुद्धा उपस्थित होते. त्यांनी न पटणाऱ्या, पुरावा नसलेल्या वक्तव्याची या कथित बाबाला इतिहासाची जाण करून दिली नाही उलट समर्थन केले. व या धीरेंद्र शास्त्री यांनी केलेल्या पापात सहभागी झाले. छत्रपती शिवाजी महाराजांचा घोर अपमान गृहमंत्र्यासमोर होत असेल व गुन्हा दाखल होत नसेल तर हा महाराष्ट्रातील जनतेच्या भावनांचा अनादर असल्याचे निवेदनात नमूद आहे. निवेदनावर प्रकाश पाटील, अविनाश उमरकर, स्वाती वाकेकर, तालुकाध्यक्ष ॲड. भाऊराव भालेराव, बाबू जमादार, शेख नासिर यांचेसह शेकडो काँग्रेस पदाधिकारी कार्यकर्त्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

सिटी न्यूज सुपरफास्ट वऱ्हाड

रविवार, दि. ३ मे २०२६ http://epaper.citynewssuperfast.com


# जनता भाजी बाजारात सर्वत्र कचऱ्याचे साम्राज्य





## साफसफाईकडे प्रशासनाचे दुर्लक्ष, नागरिक त्रस्त

प्रतिनिधी ३ मे

**अकोला :** शहरातील जनता भाजी बाजारात अस्वच्छतेचा मोठा प्रश्न समोर आला आहे. बाजार परिसरात सर्वत्र कचऱ्याचे ढीग साचलेले दिसत असून साफसफाई होत नसल्याने नागरिक आणि विक्रेत्यांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे या समस्येने गंभीर रूप धारण केले आहे. जनता भाजी बाजारात जिकडे तिकडे कचरा साचलेला दिसत आहे. बाजारात येणाऱ्या नागरिकांना दुर्गंधीचा सामना करावा लागत असून आरोग्याचा प्रश्नही निर्माण झाला आहे. नियमित साफसफाई होत नसल्यामुळे विक्रेते आणि ग्राहक दोघेही नाराजी व्यक्त करत आहेत.स्थानिक नागरिकांनी प्रशासनाकडे वारंवार तक्रारी करूनही याकडे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप केला जात आहे. त्यामुळे संबंधित विभागाने तातडीने दखल घेऊन स्वच्छतेची व्यवस्था सुधारावी, अशी मागणी नागरिकांकडून केली जात आहे. स्वच्छतेची समस्या गंभीर झाली आहे. परंतु नागरिकांना घरातील कचरा टाकण्यासाठी भुर्दंड द्यावा लागणार आहे. शहरातील विविध भागात स्वच्छतेची समस्या निर्माण झाली आहे. त्याचे व्यवस्थापन व्यवस्थित होत नाही. त्याला प्राधान्य देण्यात यावे अशी मागणी आहे.

# अनसुने दैनंदिन नायकांचा सन्मान सोहळा 6 मे रोजी



प्रतिनिधी ३ मे

**अकोला :** आर्ट ऑफ लिविंग संस्थेची ४५ वी वर्षपूर्ती तसेच गुरुदेव श्री श्री रविशंकर यांच्या ७० व्या जन्मदिवसानिमित्त अकोला येथे 'अनसुने दैनंदिन नायकांचा सन्मान' हा पुरस्कार सोहळा आयोजित करण्यात आला आहे.

स्थानीय आर.एल.टी. सायन्स कॉलेजच्या ऑडिटोरियम हॉलमध्ये आयोजित हा कार्यक्रम बुधवार, ६ मे रोजी सायंकाळी ६ ते ८ या वेळेत पार पडणार आहे. तीन गटात हा सम्मान सोहळा संपन्न होत आहे. समाजातील निस्वार्थपणे कार्य करणाऱ्या, परंतु प्रकाशझोतात न आलेल्या व्यक्तींचा यावेळी गौरव करण्यात येणार आहे. आर्ट ऑफ लिविंग संस्था गेल्या चार दशकांहून अधिक काळापासून जगभरात तणावमुक्त व हिंसामुक्त समाज घडविण्यासाठी कार्यरत आहे. योग, ध्यान, प्राणायाम आणि मानवी मूल्यांच्या प्रसारातून संस्थेने कोट्यवधी लोकांच्या जीवनात सकारात्मक बदल घडवून आणला आहे. अकोल्यातही आर्ट ऑफ लिविंगतर्फे विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात येत असून, यामध्ये मोफत योग व ध्यान शिबिरे, युवा सक्षमीकरण कार्यक्रम, ग्रामीण विकास मोहिमा, जलसंवर्धन जनजागृती, वृक्षारोपण, महिला सक्षमीकरण, आरोग्य जागरूकता, नशामुक्ती अभियान, स्वच्छता मोहिमा, रक्तदान शिबिरे आणि सामूहिक ध्यान कार्यक्रमांचा समावेश आहे.

तसेच आनंद उत्सव, हॅपिनेस प्रोग्राम, युथ लीडरशिप ट्रेनिंग प्रोग्राम आणि मेडिटेशन ड्राइव्ह यांसारख्या उपक्रमांमुळे अकोला तसेच विदर्भातील हजारो नागरिकांना मानसिक शांतता, उत्तम आरोग्य आणि जीवनाला नवी दिशा मिळाली आहे.विविध कार्याच्या माध्यमातून समाजासाठी मोलाचे कार्य करणाऱ्या खऱ्या नायकांना व्यासपीठ उपलब्ध करून देण्याचा आर्ट ऑफ लिविंगचा प्रयत्न आहे. अशा व्यक्तींचा सन्मान केल्याने समाजात सेवा, प्रेरणा आणि सकारात्मक बदलांची भावना अधिक बळकट होईल, असा संस्थेचा विश्वास आहे. आर्ट ऑफ लिविंग परिवार, अकोला यांनी शहरातील नागरिक, सामाजिक संस्था, शिक्षक, युवक वर्ग आणि मान्यवरांनी या प्रेरणादायी कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित राहून या खऱ्या नायकांचा सन्मान करण्याचे आवाहन केले आहे.

# मनपा क्षेत्रात जनगणना- २०२७ अंतर्गत स्वगणनेचे कार्य उत्साहात प्रारंभ

प्रतिनिधी ३ मे



**अकोला :** जनगणना कार्यक्रमाची सुरूवात करण्यात आली असून काम जलदगतीने व सोप्या पध्दतीने करण्यासाठी शासनाव्दारे १ ते १५ मे २०२६ या कालावधीत नागरिकांव्दारे स्वगणना करण्यासाठी https://se.census.gov.in/subission-success हे संकेत स्थळ कार्यान्वीत करण्यात आले असून याव्दारे नागरिकांनी आपली स्वगणना करणे अपेक्षित आहे.

या कार्यक्रमांतर्गत खासदार अनुप धोत्रे, आमदार वसंत खंडेलवाल, आमदार अमोल मिटकरी, आमदार रणधीर सावरकर, आमदार साजिदखान पठाण, स्थायी समिती सभापती विजय अग्रवाल, भाजपा शहर अध्यक्ष जयंत मसने, माजी आमदार गोपीकिशन बाजोरिया, पुर्व झोन समिती सभापती सौ.रश्मी अवचार, नगरसेवक डॉ.जिशान हुसैन यांनी जनगणना-२०२७ अंतर्गत स्वगणना केली आहे. शहरातील नागरिकांनी १ ते १५ मे या कालावधीत स्वगणना करून या राष्ट्रीय उत्सवात सहभागी होऊन लोकशाही बळकट करण्याचे आवाहन केले आहे.

# नाईक होमिओपॅथीमध्ये होतोय असाध्य आजारांवर उपचार

प्रतिनिधी ३ मे

### ॲडव्हान्स होमिओपॅथी द्वारे प्रभावी उपचार
### उपचारांचा लाभ झाल्याचा रूग्णांचा दावा

**अकोला :** येथील प्रसिद्ध डॉ. नाईक होमिओपॅथीमध्ये थायरॉईड, लठ्ठपणा, ॲसिडिटी, गुडघेदुखी, कंबरदुखी, संधिवात , मायग्रेन सारख्या असाध्य आजारांवर उपचार घेऊन रुग्ण आता निरोगी जीवन जगत आहेत. ॲडव्हान्स होमिओपॅथीच्या उपचारामुळे आतापर्यंत हजारो रुग्णांना मोठा फायदा झाला आहे. गेल्या ४० वर्षांपासून डॉ. नाईक होमिओपॅथीमध्ये शरीराच्या सर्व आजारांवर संपूर्ण आणि यशस्वी उपचार केले जात आहेत. ज्या रुग्णांना इतर ठिकाणी उपचार घेऊनही फरक पडलेला नाही, अशा रुग्णांनी एकदा येथे नक्कीच भेट दिली पाहिजे.अधिक माहितीसाठी




रुग्ण आणि त्यांचे नातेवाईक ९१७५९५७१२९ किंवा ९१३००१६१२९ या मोबाईल क्रमांकावर संपर्क साधू शकतात, तसेच Naikhomoeopathy.com (Youtube) वर अधिक माहिती मिळवू शकतात. येथे उपचार घेऊन पूर्णपणे बऱ्या झालेल्या एका महिला रुग्णाने आपला अनुभव व्यक्त केला आहे. माझे नांव सिमा, मी नाईक होमिओपॅथी येथे येण्यापुर्वी माझे वजन खुप वाढले होते. सारखा दम लागायचा, आणखी बरेच त्रास व्हायचे.

मायग्रेन चा त्रास होता. आता नाईक होमिओपॅथील एका महिन्याच्या उपचारानंतर माझे ६ किलो वजन कमी झाले. मला खुपच हलके वाटायला लागले आहे. सोबतच माझा मायग्रेन त्रास कमी झाला. आता जिवनात नवचैतन्य आल्यासारखे जाणवते. या उपचाराने मी १०० टक्के समाधानी आहे.

# लिनेस क्लब चार्टर डे, सेवाकार्याने साजरा झाला



प्रतिनिधी ३ मे

**अकोला :** लिनेस क्लब चार्टर डे निमित्त श्रद्धा जोशी यांच्या वतीने गरजू मजुरांना २५ किलो तांदूळ, १५ लिटर ताक आणि ५० कचोऱ्यांचे वाटप करण्यात आले. तसेच, गेल्या महिन्यात जिल्हा रुग्णालय आणि रिक्षाचालकांना श्रद्धा जोशीजींच्या वतीने ५० कापडी पिशव्यांचे वाटप करण्यात आले होते. अशा प्रकारे, आज आम्ही खऱ्या अर्थाने चार्टर डे साजरा केला. विशेष बाब म्हणजे, सचिव बीजवे, कोषाध्यक्षा उमाळे, पीडीपी स्वातीजी झुनझुनवाला, सुलेखाजी गुप्ता, गीताजी रूपारेलिया, शीतलजी अग्रवाल आणि रेखाजी शर्मा यांनी कडक उन्हात सहभागी होऊन हा प्रकल्प यशस्वी केला. लिनेस सखी आणि बिर्ला परिवाराचे सहकार्य उपक्रमासाठी लाभले. क्लबकडून विविध समाजोपयोगी उपक्रम राबवले जात असल्याने समाज बांधवांना त्याचा लाभ होतो आहे असे स्पष्ट करण्यात आले.

# गॅस सिलेंडर साठी ग्राहकांची शहरात भटकंती

## ♦ शहरातील चार एजन्सी मध्ये ग्राहकांच्या नावाची नोंदच नाही

प्रतिनिधी ३ मे

**अकोला :** शहरातील जुने शहर भागात असलेल्या समर्थ गॅस एजन्सी मार्फत ग्राहकांना वेळेवर गॅस सिलेंडर न देणे तसेच सतत एजन्सी बंद ठेवणे या कारणास्तव जिल्हा प्रशासनाच्या वतीने कारवाई करीत गॅस एजन्सी बंद करण्यात आली होती. परंतु कारवाईच्या पूर्वी ज्या ग्राहकांनी समर्थ गॅस एजन्सी मध्ये सिलेंडर साठी ऑनलाईन पैसे भरले त्या ग्राहकांना आता सिलेंडर करिता वन वन भटकावे लागत आहे.

अकोला शहरातील जुने शहर भागात असलेल्या एचपी कंपनीच्या समर्थ गॅस एजन्सी बाबत ग्राहकांनी मोठ्या प्रमाणात तक्रारी जिल्हाधिकारी तसेच जिल्हा पुरवठा विभाग यांच्याकडे केल्या होत्या. लाभार्थी गॅस धारक ग्राहक यांना वेळेवर सिलेंडर न देणे तसेच सतत दुकान बंद ठेवणे या व इतर तक्रारी च्या अनुषंगाने जिल्हा प्रशासनाने गॅस एजन्सी च्या विक्री अधिकारी यांच्या कडे कारवाई चा प्रस्ताव दाखल करताच सदर एजन्सी बंद करण्यात आली होती.

समर्थ गॅस एजन्सी मधून कारवाईच्या पूर्वी मोठ्या प्रमाणात ग्राहकांची ऑनलाईन बुकिंग करण्यात आली होती, या वेळी ग्राहकांनी एजन्सीमध्ये पैसे सुद्धा भरले होते परंतु कारवाईच्या नंतर पैसे भरलेल्या ग्राहकांना गॅस सिलेंडर करता आता वन वन भटकावे लागत आहे. या एजन्सी मधील दोन ते अडीच हजार गॅस कार्ड धारक ग्राहक अकोला शहरातील चार एजन्सी मध्ये स्थलांतरित करण्यात आले आहे. अकोला शहरातील यदुराज गॅस एजन्सी, पटेल गॅस एजन्सी, विजय गॅस एजन्सी तसेच अकोला गॅस एजन्सी या ठिकाणी समर्थ गॅस एजन्सी मधील स्थलांतरित ग्राहकांच्या याद्या लावण्यात आल्या आहेत, परंतु ज्या ग्राहकांनी कारवाईपूर्वी समर्थ गॅस एजन्सी मध्ये पैशाचा भरणा करून सिलेंडरची अपेक्षा केली होती त्या ग्राहकांना आता सिलेंडर करिता भटकंती करावी लागत आहे. अनेक ग्राहकांनी नवीन एजन्सी मध्ये जाऊन याद्या चेक केल्या परंतु त्या यादीमध्ये त्यांचे नाव आढळून आले नाही, आता या ग्राहकांना सिलेंडर देणार तरी कोण असा प्रश्न निर्माण झाला आहे. जिल्हा पुरवठा विभागाने याबाबत उचित निर्णय घेऊन ज्या ग्राहकांची समर्थ गॅस एजन्सी मध्ये बुकिंग झाली आहे त्या ग्राहकांना तात्काळ सिलेंडर उपलब्ध करून द्यावे अशी मागणी होत आहे.

# अकोट-अकोला प्रवासी गाडीचे इंजिन बंद; प्रवाशांची गैरसोय वाढली

वि प्रतिनिधी ३ मे

**अकोट** : अकोट-अकोला दरम्यान धावणाऱ्या प्रवासी गाडीचे इंजिन अचानक बंद पडल्याने शनिवारी प्रवाशांना मोठ्या गैरसोयीचा सामना करावा लागला. दक्षिण मध्य रेल्वेच्या नांदेड विभागांतर्गत चालणारी ही गाडी सेवा प्रवाशांसाठी अत्यंत महत्त्वाची असून, दररोज तीन फेऱ्यांमुळे या मार्गावर मोठ्या प्रमाणात प्रवासी वाहतूक होते.

शनिवारी सकाळी पाटसूल रेल्वे स्थानकाजवळ गाडीचे इंजिन अचानक बंद पडले. त्यामुळे रखरखत्या उन्हात प्रवाशांना बराच वेळ थांबावे लागले. अनेक प्रवासी वेळेत आपल्या गंतव्यस्थानी पोहोचू शकले नाहीत, परिणामी त्यांचे नियोजित कामांवरही परिणाम झाला. याचदरम्यान अकोल्यावरून येणारी गाडीही रद्द करण्यात आल्याने प्रवाशांची अडचण अधिकच वाढली. नियमित देखभाल व दुरुस्तीअभावी अशा घटना वारंवार घडत असल्याची नाराजी प्रवाशांकडून व्यक्त करण्यात येत आहे. या समस्येवर रेल्वे प्रशासनाने तातडीने लक्ष देऊन कायमस्वरूपी उपाययोजना करावी, अशी मागणी प्रवाशांकडून जोर धरत आहे.

# फार्मर आयडीसाठी अंतिम मुदत 20 मेपर्यंत !

## ♦ नोंदणी पूर्ण न केल्यास योजनांचा लाभ मिळणे कठीण

प्रतिनिधी ३ मे

**अकोला :** ॲग्रीस्टॅक योजनेंतर्गत शेतकऱ्यांसाठी फार्मर आयडी अनिवार्य करण्यात आली आहे. १५ एप्रिलपासून कृषी विभागाच्या विविध योजनांचा लाभ घेण्यासाठी फार्मर आयडी बंधनकारक असल्याने, अद्याप नोंदणी न केलेल्या शेतकऱ्यांनी २० मेपर्यंत आपला आयडी काढून घेणे क्रमप्राप्त आहे.

राज्यात १४ नोव्हेंबर २०२४ पासून ॲग्रीस्टॅक योजनेची अंमलबजावणी सुरू झाली. या योजनेद्वारे प्रत्येक शेतकऱ्याचा डिजिटल प्रोफाइल तयार करण्यात येत असून, त्यात जमीनधारकांची माहिती, पीक पद्धती, लाभ घेतलेल्या योजना आदींचा समावेश असतो. त्यामुळे शासकीय योजनांचा लाभ पारदर्शक व थेट शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवण्यास मदत होत आहे. राज्यातील एकूण १.७१ कोटी खातेदारांपैकी १.३२ कोटी शेतकऱ्यांनी आतापर्यंत फार्मर आयडी तयार केली आहे. फार्मर आयडीमुळे शेतकऱ्यांना पीकविमा, अनुदान, बियाणे, खत वितरण, विविध शासकीय योजना यांचा लाभ मिळवणे सुलभ होणार आहे. तसेच भविष्यात सर्व कृषी सेवा व अनुदाने या आयडीशी संलग्न करण्याची प्रक्रिया सुरू असल्याने, आयडी नसलेल्या शेतकऱ्यांना योजनांपासून वंचित राहण्याची शक्यता आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी अंतिम मुदतीची वाट न पाहता तातडीने नोंदणी पूर्ण करावी. २० मे २०२६ नंतर योजनांच्या लाभासाठी अडचणी निर्माण होऊ शकतात, त्यामुळे उर्वरित शेतकऱ्यांनी लवकरात लवकर फार्मर आयडी काढून घ्यावी, असे आवाहन कृषी विभागाने केले आहे.

### अशी आहे नोंदणी प्रक्रिया

◆ शेतकरी आपल्या जवळच्या सेवा सुविधा केंद्रात (सीएससी) जाऊन फार्मर आयडी तयार करू शकतात. याशिवाय ॲग्रीस्टॅक पोर्टलवरून स्वतःही ऑनलाइन नोंदणी करण्याची सुविधा उपलब्ध आहे. यासाठी आधार क्रमांक, मोबाइल नंबर व जमीन संबंधित माहितीची आवश्यकता आहे.

### १३ टक्के शेतकरी अद्यापही फॉर्मर आयडीपासून दूर!

◆ अकोला जिल्ह्यातही नोंदणीची गती चांगली असून, ९ एप्रिल २०२६ पर्यंत २ लाख ९४ हजार १२६ खातेदारांपैकी २ लाख ५७ हजार ३४१ शेतकऱ्यांनी आयडी काढली आहे. ही टक्केवारी ८७.४९ इतकी झाली असून, सुमारे १३ टक्के शेतकरी अद्याप नोंदणीपासून दूर आहेत.

# अकोला क्रीडा प्रबोधिनीचा बॉक्सर गोपाल गणेशे भारतीय संघात

## ♦ उझबेकिस्तान मध्ये होणार एशियन बॉक्सिंग स्पर्धा

प्रतिनिधी ३ मे

**अकोला :** आंतरराष्ट्रीय क्रीडाक्षेत्रात भारताची ताकद पुन्हा एकदा झळकणार आहे.एशियन U-१५ & U-१७ मुले/मुली बॉक्सिंग चॅम्पियनशिप स्पर्धा उझबेकिस्तान २०२६ या अत्यंत प्रतिष्ठेच्या स्पर्धेसाठी भारतीय संघ जाहीर झाला. एशियन बॉक्सिंग चॅम्पियनशिप ताश्कंद, उझबेकिस्तान असून, महाराष्ट्राच्या जिगरबाज बॉक्सर गोपाल रामेश्वर गणेशे याने राष्ट्रीय संघात धडक मारत सर्वांचे लक्ष वेधून घेतले आहे.

दि. १ ते १६ मे २०२६ दरम्यान ताश्कंद, उझबेकिस्तान येथे होणाऱ्या या स्पर्धेत गोपाल भारताचा झेंडा उंचावण्यासाठी सज्ज झाला आहे. कठोर परिश्रम, आक्रमक खेळशैली आणि अचूक पंचिंगच्या जोरावर त्याने प्रतिस्पर्ध्यांना नेहमीच चितपट केले आहे.

# अकोला बाजारपेठेत आंब्यांच्या मागणीत वाढ

## ♦ हापूस, केसर, दशहरीसह विविध आंब्यांची रेलचेल

प्रतिनिधी ३ मे



**अकोला :** वाढत्या उन्हासोबतच बाजारपेठेत आंब्यांची मोठ्या प्रमाणावर आवक झाली असून सर्वत्र आंब्यांचा गोड सुगंध दरवळत आहे. विविध प्रकारचे आंबे बाजारात उपलब्ध असून नागरिकांकडून आंब्यांना मोठा प्रतिसाद मिळत आहे. दरांमध्ये फरक असला तरी आंब्याची मागणी दिवसेंदिवस वाढताना दिसत आहे.

अकोला शहरातील बाजारपेठ सध्या आंब्याने अक्षरशः भरून गेली आहे. हापूस, केसर, दशहरी, लंगडा, तोतापुरी अशा विविध प्रकारचे आंबे बाजारात विक्रीसाठी उपलब्ध आहेत. यापैकी हापूस आंबा आंब्यांचा राजा म्हणून ओळखला जातो, तर केसर आंबा गोडवा आणि सुगंधासाठी प्रसिद्ध आहे. दरांबाबत बोलायचे झाल्यास, हापूस आंब्याचे दर तुलनेने जास्त असून इतर स्थानिक आंबे मध्यम दरात उपलब्ध आहेत. आकार आणि गुणवत्तेनुसार किंमतीत बदल दिसून येतो. आंब्यामध्ये व्हिटॅमिन, फायबर आणि पोषक घटक मुबलक प्रमाणात असल्यामुळे तो आरोग्यासाठीही लाभदायक मानला जातो. उन्हाळ्यात शरीराला थंडावा देण्यासाठी आणि ऊर्जा मिळवण्यासाठी नागरिक मोठ्या प्रमाणावर आंब्यांची खरेदी करत आहेत. विक्रेत्यांच्या मते, मागील काही दिवसांत आंब्यांच्या विक्रीत मोठी वाढ झाली असून बाजारात ग्राहकांची गर्दी वाढली आहे. अकोलेकरांकडून आंब्याला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून येणाऱ्या दिवसांतही ही मागणी कायम राहण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# वादळामुळे टीनपत्रे उडाली; अकोट-अकोला मार्गावर वाहतूक विस्कळीत

प्रतिनिधी ३ मे

**अकोट :** तालुक्यात वाढत्या तापमानामुळे उकाडा जाणवत असतानाच शनिवारी सायंकाळी सुमारे पाच वाजताच्या सुमारास अकोट-अकोला मार्गावर अचानक जोरदार वादळाने हजेरी लावली. या वादळामुळे नव्याने उभारण्यात आलेल्या उपजिल्हा रुग्णालयासमोरील काही लोखंडी टीनपत्र्यांचे खोके उडून थेट रस्त्यावर येऊन पडले. या मार्गावर काही अतिक्रमणधारकांनी ठेवलेल्या लोखंडी टीनपत्र्यांच्या खोक्यांमुळे परिस्थिती अधिकच गंभीर बनली. वादळाच्या झोतामुळे हे खोके मुख्य रस्त्यावर आल्याने काही काळ वाहतूक विस्कळीत झाली. त्या वेळी रस्त्यावर चारचाकी व दुचाकी वाहनांची मोठ्या प्रमाणात वर्दळ असल्याने अपघाताचा धोका निर्माण झाला होता. सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही. घटनेनंतर स्थानिक नागरिकांनी प्रशासनाकडे या मार्गावरील अतिक्रमणे तात्काळ हटवण्याची मागणी केली आहे. तसेच अशा घटना टाळण्यासाठी आवश्यक सुरक्षा उपाययोजना कराव्यात, अशीही मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.


हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी भास्कर प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट क्र. टी- ५१ एम. आय. डी. सी. फेज - ४, अकोला ग्रोथ सेंटर, येवता रोड, शिवणी, अकोला - ४४४००२ येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले. ▪ **मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख** ▪ **संपर्क –** 0724-2435573, 2444774 - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/2012/49642, RRC Helpline No. 8484842135


CMYK CMYK